अहवाल क्रमांक :१३८

# पंचायती राज समिती

(२०१२-२०१३)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

## महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या भंडारा व अहमदनगर जिल्हा परिषदेच्या सन २००४-२००५ च्या लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत

तेरावा अहवाल

(सदर अहवाल दिनांक १६ एप्रिल, २०१३ रोजी विधानसभेस/ विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१३

# पंचायती राज समिती

(२०१२-२०१३)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या भंडारा व अहमदनगर जिल्हा परिषदेच्या सन २००४-२००५ च्या लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदाबाबत

## तेरावा अहवाल

(तीन)

## पंचायती राज समिती

## (सन २०१२-२०१३)

## (३१ ऑक्टोबर, २०१२)

**समिती प्रमुख**

१. श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री.काशिराम पावरा, वि.स.स.

३. श्री.वैजनाथ शिंदे, वि.स.स.

४. श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.

५. श्री.विजय खडसे, वि.स.स.

६. श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

७. श्री.दिलीप माने, वि.स.स.

८. श्री.भारत भालके, वि.स.स.

९. श्री.उदय सामंत, वि.स.स.

१०. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

११. श्री.बापूसाहेब पठारे, वि.स.स.

१२. श्री.आण्णा बनसोडे, वि.स.स.

१३. श्री.दादाराव केचे, वि.स.स.

१४. श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.

१५. *श्री.जयकुमार रावल, वि.स.स.

१६. श्री.विष्णू सावरा, वि.स.स.

१७. श्री.संजय (बंडू) जाधव, वि.स.स.

१८. श्री.संजय राठोड, वि.स.स.

१९. श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.

२०. श्री.प्रकाश भोईर, वि.स.स.

**(चार)**

२१. *श्री.एम.एम.शेख, वि.प.स.

२२. डॉ.सुधीर तांबे, वि.प.स.

२३. *श्री.दिपक साळुंखे, वि.प.स.

२४. श्री.विक्रम काळे, वि.प.स.

२५. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

**निमंत्रीत**

२६. श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
श्री.भाऊसाहेब कांबळे, अतिरक्ति सचिव
श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव
श्री.रंगनाथ खैरे, कक्ष अधिकारी

---

*सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली व श्रीमती उषा दराडे, वि.प.स. यांच्या रिक्त झालेल्या जागांवर श्री.एम.एम.शेख, वि.प.स. व श्री.दिपक साळुंखे, वि.प.स. यांची दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजी पंचायती राज समितीचे समिती सदस्य म्हणून मा.सभापती, विधानपरिषद यांनी नामनियुक्ती केली आहे.

*श्री.जयकुमार रावल, वि.स.स. यांचे सदस्यत्व सभागृहाने दिनांक ३१ डिसेंबर, २०१३ पर्यंत निलंबित केले आहे.

**(पाच)**

## पंचायती राज समिती

**(सन २०१२-२०१३)**

**(३१ मे, २०१२)**

**समिती प्रमुख**

१. श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री.काशिराम पावरा, वि.स.स.

३. श्री.वैजनाथ शिंदे, वि.स.स.

४. श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.

५. श्री.विजय खडसे, वि.स.स.

६. श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

७. श्री.दिलीप माने, वि.स.स.

८. श्री.भारत भालके, वि.स.स.

९. श्री.उदय सामंत, वि.स.स.

१०. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

११. श्री.बापूसाहेब पठारे, वि.स.स.

१२. श्री.आण्णा बनसोडे, वि.स.स.

१३. श्री.दादाराव केचे, वि.स.स.

१४. श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.

१५. श्री.जयकुमार रावल, वि.स.स.

१६. श्री.विष्णू सावरा, वि.स.स.

१७. श्री.संजय (बंडू) जाधव, वि.स.स.

१८. श्री.संजय राठोड, वि.स.स.

१९. श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.

२०. श्री.प्रकाश भोईर, वि.स.स.

**(सहा)**

२१. रिक्त

२२. डॉ.सुधीर तांबे, वि.प.स.

२३. रिक्त

२४. श्री.विक्रम काळे, वि.प.स.

२५. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

**निमंत्रीत**

२६. श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव
श्री.रंगनाथ खैरे, कक्ष अधिकारी

---

सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली, वि.प.स. व श्रीमती उषा दराडे, वि.प.स. यांची दिनांक २७ जुलै, २०१२ रोजी सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे पदे रिक्त आहेत.

**(सात)**

## पंचायती राज समिति
## (२०१०-२०११)
## (दिनांक ४ मार्च, २०१०)

**समिती प्रमुख**

१ श्री. बबनराव शिंदे, वि.स.स.

**समिती सदस्य**

२ ॲड, के.सी.पाडवी, वि.स.स.

३ श्री. माधवराव पवार, वि.स.स.

४ श्री. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, वि.स.स.

५ श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

६ श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

७ श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

८ श्री. बच्चू उर्फ ओमप्रकाश कडू, वि.स.स.

९ श्री. उदय सामंत, वि.स.स.

१० श्री. बापुसाहेब पठारे, वि.स.स.

११ श्री. आण्णा बनसोडे, वि.स.स.

१२ श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

१३ श्री. खुशाल बोपचे, वि.स.स.

१४ श्री. सुरेश खाडे, वि.स.स

१५ श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.

१६ श्री. विष्णू सावरा, वि.स.स.

१७ श्री. अनिल भैय्या राठोड, वि.स.स.

१८ श्री. विजयराव औटी, वि.स.स.

१९ श्री. दादाजी भुसे, वि.स.स.

२० श्री. नितीन भोसले, वि.स.स.

**(आठ)**

२१ प्रा. सुरेश नवले, वि.प.स.

२२ श्री. विक्रम काळे, वि.प.स.

२३ ॲड. उषा दराडे, वि.प.स.

२४ श्री. सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

२५ श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव,
श्री.प्र.स.मयेकर, कक्ष अधिकारी,

--------------------------------------------------------------------------------

**(नऊ)**

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा तेरावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१२-२०१३ करिता समिती दिनांक ३१ मे, २०१२ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

सन २००४-२००५ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात सन २०१०-२०११ साठी गठीत झालेल्या समितीने भंडारा व अहमदनगर जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली.

समितीने भंडारा जिल्हा परिषदेस दिनांक २१, २२ व २३ फेब्रुवारी, २०१२ रोजी भेट देऊन श्री.अरुण डुबे, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.पंकज गिरी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी भंडारा जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

समितीने अहमदनगर जिल्हा परिषदेस दिनांक २८, २९ फेब्रुवारी व ०१ मार्च, २०१२ रोजी भेट देऊन श्रीमती रुबल अग्रवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री.कृष्णराव साळुंखे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, अहमदनगर जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

सन २०१२-२०१३ करिता गठीत झालेल्या समितीने भंडारा व अहमदनगर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्याबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक ०८ ऑगस्ट, २०१२ रोजी जिल्हा परिषद, भंडारा तसेच दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१३ रोजी जिल्हा परिषद, अहमदनगर संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री.सहारिया, अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.टी.एस.बेंजामिन, अप्पर मुख्य सचिव, आरोग्य विभाग, श्री.व्ही.गिरीराज, प्रधान सचिव, रोहयो, श्री.एस.एस.संधू, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव, पाणी पुरवठा विभाग, श्री.मुखर्जी, सचिव (बांधकाम), सार्वजनिक बांधकाम

**(दहा)**

विभाग, श्री.दि.ग.मोरे, सह सचिव, श्री.ना.रा.रौराहे, सह सचिव, श्री.जी.के.नाईक, श्रीमती सीमा उकार्डे, सह सचिव, श्री.कांतीलाल उमाप, उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.सुनिल चव्हाण, उप सचिव, जलसंधारण विभाग, श्री.एकनाथ मोरे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री.एम.पी.तुम्मोड, उप आयुक्त (रोहयो),नाशिक, श्री.पी.यू.बिसेन, कार्यकारी अभियंता, ल.पा.वि.जि.प.अहमदनगर यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या भंडारा व अहमदनगर जिल्हा परिषदेच्या कामकाजांची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१२-२०१३ साठी गठीत झालेल्या समितीने दिनांक ०९ एप्रिल, २०१३ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : ०९ एप्रिल, २०१३

**चंद्रकांत दानवे,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती

(अकरा)

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण क्रमांक | विषय | परिच्छेद क्रमांक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|
| | | **प्रकरण एक** | | |
| | | **जिल्हा परिषद, भंडारा** | | |
| १ | एक | अभिलेखे उपलब्ध करणेबाबत | ३.५८७ (४१,४२,४४,४५) | |
| | | **प्रकरण दोन** | | |
| | | **जिल्हा परिषद, अहमदनगर** | | |
| २ | दोन | रोजगार हमी योजनेवरील हजेरी सहाय्यकांना सेवेत सामवुन घेताना अनुज्ञेयतेपेक्षा वरिष्ठ वेतनश्रेणी लागु केले बाबत व इतर अनियमिततांबाबत | ३.१० | |
| | | **प्रकरण तीन** | | |
| ३ | तीन | जिल्हा परिषदांनी लेखा परिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणेबाबत | ३.५८७ | |
| | | **परिशिष्ट** | | |
| | | समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | | |

## प्रकरण एक

## जिल्हा परिषद, भंडारा

**१.१ अ) अभिलेखे उलपब्ध करणेबाबत :- परिच्छेद क्रमांक ३.५८७ (४१)**

**सन २००४-२००५ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील जिल्हा परिषद, भंडारा यांनी लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध करणेबाबत, यावर लेखा परिक्षकांनी खालील प्रमाणे अभिप्राय दिले आहेत.**

बांधकाम उपविभाग तुमसरला दिनांक ९/८/२००५ ला अभिलेख उपलब्ध करण्यासंबंधी कळवून आणि लेखा परिक्षणाचे पत्र क्रमांक क्यु दिनांक ८/८/२००५ नुसार विनंती करुनही खालील खर्चासंबंधी संबंधित कामाचे करारनामा, अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तक लेखा परिक्षणास उपलब्ध न झाल्याने पडताळणी करता आली नाही. तर संबंधित अभिलेख लेखा परिक्षणास सादर करण्यात यावा.

| अ.क्र. | प्रभा क्र. | रक्कम | कामाचे नाव | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | २९०/दि.१.११.०४ | १,२४,७७०/- | कांद्री बेसरा रोड बांधकाम | प्रथम व अंतिम देयक |
| २ | २९१/दि.१.११.०४ | ४८६५३/- | कांद्री जूना बस स्टॉप शेतापर्यंत जाणारा रस्ता | प्रथम व अंतिम देयक |
| ३ | ३२०/दि.१.११.०४ | ४००५३/- | ते कुकडे पांधन रोड | प्रथम व अंतिम देयक |
| ४ | ७५६/दि.३१.३.०५ | १०५७१४/- | जांब तांडगांव रस्ता | प्रथम व अंतिम देयक |
| | | | (मोजमाप पुस्तक वगळून) तात्परते आमान्य रु ३२९१९०/- | |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषदेने खालील प्रमाणे खुलासा केला :**

सदर कामाचे देयक कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडून पारीत झाल्यानंतर सदर देयक खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, तुमसर यांचे स्तरावर रो.ह.यो.चे अनुदान उपलब्ध असल्याने सदर देयक, पारीत करण्यासाठी सादर करण्यात आले होते. त्यामुळे संबंधित कामाचे करारनामा, अंदाजपत्रक व मोजमाप

पुस्तिका लेखा परिक्षणास वेळेवर उपलब्ध करुन देण्यात आले नव्हते. परंतु सदर कामाचे करारनामा, अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिका उपलब्ध आहे.

**ब) लेखा परिक्षणास लेखे सादर न करणेबाबत :- परिच्छेद क्रमांक ३.५८७ (४२)**

सार्वजनिक बांधकाम विभागाचे वित्तीय वर्ष २००४-२००५ चे लेखा परिक्षणात खालील तपशिलाचे प्रशासकीय मंजूरी तांत्रिक मंजूरी प्राकलन मोजमाप पुस्तिका इत्यादी दस्ताऐवज आणि त्यासंबंधिची नस्ती लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नाही. म्हणून अर्धसमास ज्ञापन क्र.१ दि.१८/१०/०५, अर्धसमास ज्ञापन क्र.२ दि.२६/१०/०५ आणि अर्धसमास ज्ञापन क्र.३ दि.९/११/०५ अन्वये लेखा परिक्षणास लेखे उपलब्ध करुन घेण्यासाठी कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग जिल्हा परिषद, भंडारा यांना देवून अर्धसमास ज्ञापनाची प्रत मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांना देण्यात आली. एवढेच नव्हे तर दि.१९/११/०५ म्हणजेच लेखा परिक्षणाचे शेवटचे दिवशी पर्यंत श्री.मेश्राम प्रभारी कार्यकारी अभियंता यांना वेळोवेळी प्रत्यक्ष भेटून लेखे लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन घेण्याचे दृष्टीने चर्चेद्वारे विनंती करण्यात आली. तरी पण खालील तपशिलाचे लेखे परिक्षणासाठी संबंधित सर्व दस्तऐवज लेखा परिक्षणासाठी उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे खालील प्रमाणे लेखा परिक्षण होवू शकले नाही.

प्रमाणकांची संख्या २२७ असून त्या संबंधिची आक्षेपित रक्कम रुपये ३,८०,६२,४२१/- आहे.

**उपरोक्त आक्षेपा संदर्भात जिल्हा परिषदेने खालील प्रमाणे खुलासा केला :**

सन २००४-२००५ या वर्षात लेखा परिक्षणासाठी लेखा परिक्षण पुनर्विलोकन अहवालातील नमुद परिच्छेद संदर्भात न दाखविलेले लेखे संबंधी संपूर्ण दस्ताऐवज उपलब्ध ठेवण्यात आले आहे.

**क) विहीर बांधकामाच्या अभिलेख उपलब्ध करण्याबाबत :- परिच्छेद क्रमांक ३.५८७**

प्र.क्र.४१ दि.९/७/२००४ रुपये ६९३१०/-

प्र.क्र.४२ दि.९/७/२००४ रुपये ५९२१६/-

वरील प्रमाणकावर खालील कामाचे प्रदान करण्यात आले.

| अ.क्र. | कामाचे नाव | बिलाचा तपशिल | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | पिण्याच्या पाण्याची विहीर बांधकाम, खैरलांजी | प्रथम व अंतिम | ६९३१० |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | पिण्याच्या पाण्याची विहीर बांधकाम, लंजेरा | प्रथम व अंतिम | ५९२१६ |
| | | | १२८५२६ |

लेखा परिक्षणाचे पत्र क्र.ल३/बी-१/पंसतुमसर/०४-०५/लेप/कार्य/क्यू-१ दि.८/८/२००५ अन्वये अभिलेख उपलब्ध करण्यासंबंधी विनंती करुनही वर नमुद कामासंबंधी करारनामा व मोजमाप पुस्तिका लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नसल्याने खर्चाची पडताळणी करण्यात आली नाही. ती संबंधित अभिलेख लेखा परिक्षणास उपलब्ध करण्यात यावी तो पर्यंत खर्च लेखा परिक्षणास तात्पुरते अमान्य करण्यात येते.

तात्पुरते अमान्य रुपये १२८५२६/-

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषदेने खालील प्रमाणे खुलासा केला :**

सन २००४-०५ चे लेखा परिक्षण सुरु असतांना परिच्छेदात नमुद कामाचे दस्ताऐवज लेखा परिक्षण पथकास दाखविण्यात आले आहे व लेखा परिक्षण पथकाने सदर दस्ताऐवज तपासले असल्याचे निदर्शनास येते. तथापि, परिच्छेदात नमुद केल्यानुसार अनुक्रमांक १ व २ पिण्याचे पाण्याची विहीर खेरलांजी व लंजेरा ता.तुमसर येथील कुशल कामाचे देयकाचा करारनामा व मोजमाप पुस्तिका उपलब्ध असून लेखा परिक्षणास दाखविता येईल.

आक्षेप नमुद केलेली दोन्ही कामांना पूर्णत्वाचे प्रमाणपत्र देण्यात आलेले आहेत. दोन्ही विहीरींचे काम पूर्ण झाल्यामुळे झालेला खर्च फलदायी ठरलेला आहे. त्यामुळे झालेला खर्च मान्य करावा.

**ड) लेखे लेखापरिक्षणांस सादर न करणे गंभीर अनियमितता :- परिच्छेद क्रमांक ३.५८७ (४४)**

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद, भंडारा अंतर्गत उपविभाग भंडारा येथील सन २००४-२००५ या वित्तीय वर्षाचे निवडक महिन्यांचे लेखापरिक्षणाचे वेळी लेखा परिक्षणांची पूर्व सूचना तसेच लेखापरिक्षणाचे वेळी दिलेली अर्धसमास पत्रे व मौखिकरित्या वारंवार मागणी करुनही (दिलेल्या लेखा परिक्षणांचा कार्यक्रम अर्धसमास पत्र क्र.१ दिनांक २०/३/२००० पत्र क्र.३ दिनांक २३/३/२०००) पुढील तपशिलात दर्शविल्याप्रमाणे लेखे लेखापरिक्षणांस सादर केलेले नाही. एकंदरीत मागील काही वर्षापासून लेखा परिक्षणास सादर न करण्याची प्रवृत्ती वाढली आहे व त्यासंबंधाने या अगोदरचे लेखापरिक्षण अहवालातही परिच्छेद नमूद

केलेले आहेत. लेखापरिक्षण चालू असतांना विहित नियोजित वेळेवर लेखापरिक्षणासाठी लेखे सादर न केल्याने कामात अनियमितता असल्याची शक्यता नाकरता येत नाही.

लेखे लेखापरिक्षणांस सादर करणे ही बाब मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम १९३० व कलम ४ ते ५ व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९०८ चे नियम ०८ अन्वये अनिर्वाय ठरलेली असून याबाबत टाळाटाळ करणाऱ्यां विरुध्द जबाबदारी निश्चित करुन लेखापरिक्षा अधिनियमाचे कलम ७ तसेच मुंबई नागरी सेवा (शिस्त व अपिल) १९८१ मधील तरतूदीन्वये कार्यवाही करुन अनुपाल सादर करावे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषदेने खालील प्रमाणे खुलासा केला :**

संपूर्ण दस्ताऐवज उपलब्ध आहेत. सदर प्रमाणकानुसार झालेला खर्च हा योग्य व नियमानुसार आहे. यात कोणत्याही प्रकारची अनियमितता किंवा अफरातफर नाही. तरी झालेला खर्च हा मान्य करण्यात यावा आणि सदर प्रमाणके लेखा परिक्षणास उपलब्ध करुन देण्यात येतील.

**इ) जिल्हा परिषदांनी लेखा परिक्षणासाठी अभिलेख सादर न करणेबाबत :-**

**परिच्छेद क्रमांक ३.५८७ (४५)**

**१) लेखा परिक्षणास लेखे सादर न करणे (प्रा.आ.केंद्र आसगाव, पंचायत समिती पवनी) परिच्छेद क्रमांक ३८**

पंचायत समिती पवनीचे सन २००४-०५ या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षण करतांना पंचायत समिती अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र आसगावचे लेखा परिक्षण करणेकरिता दि.२५/७/०५ ला लेखा परिक्षण करणेबाबत कळविले होते. परंतु प्रा.आ.केंद्र आसगावने सदर कालावधीत लेखे उपलब्ध करण्यात न आल्याने क्यू-१/०५ दिनांक २२/७/०५ चे अर्धसमास पत्राद्वारे लेखे उपलब्ध करण्याबाबत सुचविले परंतु लेखा परिक्षणात लेखे सादर न केल्यामुळे खालील निवडक महिन्याचे प्रमाणकाद्वारे झालेला खर्च तात्पुरता अमान्य करण्या येतो.

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम | योजनेचे नाव |
|---|---|---|---|
| ४०६ ते ४०८ | ११/०४ | ३१३३७/- | अभिकरण |
| ४१४ ते ४१६ | ११/०४ | ९०००/- | अभिकरण |
| ७२२ ते ७२४ | १७/३/०५ | २६२२/- | अभिकरण |
| ७३६ ते ७३८ | ३१/३/०५ | १७४३८/- | अभिकरण |

| | | | |
|---|---|---|---|
| ६३८ ते ६४० | १/११/०४ | ६९०३९ | हस्तांतरित |
| ६७८ ते ६८७ | ३/११/०४ | ३१४६२ | हस्तांतरित |
| ७५० ते ७५५ | ३/११/०४ | ११२५७/- | हस्तांतरित |
| १२०० ते १२१५ | १०/३/०५ | २३९५१/- | हस्तांतरित |
| १२८२ ते १२८३ | ३१/३/०५ | ४५०४६/- | हस्तांतरित |
| १३२४ ते १३४० | ३१/३/०५ | २५३६८/- | हस्तांतरित |
| १४०९ ते १४१० | ३१/३/०५ | २२५७९/- | हस्तांतरित |
| १६५६ ते १६५५ | ३१/३/०५ | १९४६०/- | हस्तांतरित |
| १७३९ | ३१/३/०५ | ७५८/- | हस्तांतरित |
| | एकूण | ३,०९,३१७/- | |

तात्पुरते अमान्य रुपये ३,०९,३१७/-

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषदेने खालील प्रमाणे खुलास केला :**

१) प्राथमिक आरोग्य केंद्र आसगाव येथील लिपिक श्री.आर.के.चौधरी, कनिष्ठ सहाय्यक हे दिनांक २७/३/०६ ला निलंबित झाले त्यांचा कार्यभार श्री.जी.एस.इंगोले, औषधी निर्माता यांना देण्यात आले होते. त्यांना लिपिक वर्गीय कामांचा अनुभव नसल्यामुळे रेकॉर्ड वेळेवर दाखवु शकले नाही. रेकॉर्ड न दाखविल्याबाबत वैद्यकिय अधिकारी यांचे स्पष्टीकरण मागविण्यात आले होते. परंतु लेखा परिक्षण संपण्यापूर्वी रेकॉर्ड लेखा परिक्षकास दाखविण्यात आले होते. प्राथमिक आरोग्य केंद्रात झालेला खर्च रुपये ३,०९,३१७/- कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्यावर झालेला आहे. झालेला खर्च नियमित व बांधील स्वरुपाचा आहे.

**२) लेखा परिक्षणास लेखे सादर न करणे (प्रा.आ.केंद्र बेटाळा, पंचायत समिती, मोहाडी) परिच्छेद क्रमांक ३९**

पंचायत समितीने मोहाडीचे सन २००४-२००५ या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षण करतांना पंचायत समिती अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र बेटाळाचे लेखा परिक्षणाबाबत लेखे सादर करणेकरिता दि.१३/७/०५ ला लेखा परिक्षण करणेबाबत कळविले होते. परंतु प्रा.आ.केंद्र बेटाळा यांनी सदर कालावधीत लेखा तपासणीकरिता लेखे उपलब्ध करण्यात न आल्याने अर्धसमास पत्र क्रमांक क्यु-२/०५ दि.१८/७/०५ द्वारे लेखे उपलब्ध करण्याबाबत सुचविले परंतु लेखा परिक्षण संपेपर्यंत लेखे सादर केलेले नाही. त्यामुळे खालील प्रमाणकाद्वारे झालेला खर्च तात्पुरता अमान्य करण्यात येतो.

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम | योजनेचेनाव |
|---|---|---|---|
| २४९ | ६/११/०४ | १२०९४/- | अभिकरण |
| २९१ | ६/११/०४ | १५००/- | अभिकरण |
| ४६८ | ३१/३/०५ | ११९४४/- | अभिकरण |
| ६१८ | ३१/३/०५ | २०००/- | अभिकरण |
| ६१९ | ३१/३/०५ | ९६७/- | अभिकरण |
| ७९४ | ८/११/०४ | ९०४७/- | हस्तांतरित |
| ८१६ | ८/११/०४ | १५००/- | हस्तांतरित |
| ८१७ | ८/११/०४ | १९५००/- | हस्तांतरित |
| ८१८ | ८/११/०४ | ८७७५/- | हस्तांतरित |
| १९२४ | ३१/३/०५ | ४५७५/- | हस्तांतरित |
| १४४५ | ३१/३/०५ | ८८४७/- | हस्तांतरित |
| ७९३ | ६/११/०४ | १०९३८३/- | हस्तांतरित |
| ७९५ ते ८०२ | ६/११/०४ | ८७७८/- | हस्तांतरित |
| १४८६ ते १४४९ | ३०/३/०५ | ९८९२७/- | हस्तांतरित |
| ८१९ ते ८२८ | ८/११/०४ | १०४३२/- | हस्तांतरित |
| १४६२ | ३१/३/०५ | १२६९०/- | हस्तांतरित |
| १४६३ | ३१/३/०५ | १०९३/- | हस्तांतरित |
| १६०५ ते १६०७ | ३१/३/०५ | १००६६/- | हस्तांतरित |
| १९९५ ते १९२३ | ३१/३/०५ | १०४३६/- | हस्तांतरित |
| | एकूण | ३,४२,५५४/- | |

तात्पुरते अमान्य रुपये ३,४२,५५४/-

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषदेने खालील प्रमाणे खुलासा केला :**

२) वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र बेटाळा यांनी रेकॉर्ड न दाखविल्याबाबत त्यांचे कडून स्पष्टीकरण मागविण्यात आले होते. त्यांचे स्पष्टीकरण दिनांक १९/८/०६ नुसार प्राथमिक आरोग्य केंद्रातील लिपिक रजेवर असल्यामुळे वेळीच रेकॉर्ड दाखविण्यात आले नाही. परंतु लेखा परिक्षण संपण्यापूर्वी रेकॉर्ड दाखविण्यात आले. लेखा परिक्षकांनी रेकॉर्ड त्यांचे कार्यालयात (उप मुख्य लेखा परिक्षकाचे कार्यालय) दाखविण्याबाबत कळविले. रेकॉर्ड त्यांचे कार्यालयात नेल्यावरही त्यांनी रेकॉर्ड पाहिले नाही. असे वैद्यकीय अधिकारी यांनी कळविले आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र बेटाळा येथील झालेला खर्च रुपये ३,४२,५५४/- कर्मचाऱ्यांच्या वेतन व इतर भत्यावर झालेला आहे. झालेला खर्च नियमित व बांधील स्वरुपाचा आहे.

**३) लेखा परिक्षणास लेखे सादर न करणे (प्रा.आ.केंद्र., पंचायत समिती, मोहाडी) परिच्छेद क्र.४०**

पंचायत समिती मोहाडीचे सन २००४-०५ या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षण करताना पंचायत समिती अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र वरठीचे लेखा परिक्षण करणेकरीता लेखे सादर करणेबाबत दिनांक १३/७/०५ ला लेखा परिक्षण करणेबाबत कळविले होते. परंतु प्रा.आ.केंद्र वरठीने सदर कालावधीत लेखे उपलब्ध न आल्याने दिनांक १८/७/०५ ला अर्धसमास पत्र क्र.क्यू-२ द्वारे लेखे उपलब्ध करण्याबाबत सुचविले परंतु लेखा परिक्षण संपेपर्यंत लेखे सादर केलेले नाही. त्यामुळे खालील प्रमाणकाद्वारे झालेला खर्च तात्पुरता अमान्य करण्यात येतो.

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम | योजनेचे नाव |
|---|---|---|---|
| ३०४ | ९/११/०४ | १२६१२/- | अभिकरण |
| ४७१ | ३०/३/०५ | १३४०६/- | अभिकरण |
| ५४४ | ३०/३/०५ | २४२/- | अभिकरण |
| ५४७ | ३१/३/०५ | ८४९/- | अभिकरण |
| ५४८ | ३०/३/०५ | ४४७/- | अभिकरण |
| ३०५ | ९/११/०४ | ८६८३/- | अभिकरण |
| ३०७ | ९/११/०४ | १५००/- | अभिकरण |
| ४७० | ३०/३/०५ | ८९०३/- | अभिकरण |
| ३०६ | ९/११/०४ | २६१४५/- | अभिकरण |
| ३०८ | ९/११/०४ | ४५००/- | अभिकरण |
| ४६९ | ३०/३/०५ | २५६६२/- | अभिकरण |
| ५४२ | ३१/३/०५ | ९०८/- | अभिकरण |
| ५४३ | ३१/३/०५ | ११५०/- | अभिकरण |
| ५४५ | ३१/३/०५ | १५०७/- | अभिकरण |
| ५४६ | ३१/३/०५ | ११०५/- | अभिकरण |
| ८८५ | ९/११/०४ | ३३७६६/- | हस्तांतरित |
| ८९१ | ९/११/०४ | ६०००/- | हस्तांतरित |
| १४५१ | ३०/३/०५ | ३३८६३/- | हस्तांतरित |
| १८६० | ३१/३/०५ | ७९९/- | हस्तांतरित |
| १८६५ | ३१/३/०५ | २६०२/- | हस्तांतरित |
| ८८६ | ९/११/०५ | ६५४८/- | हस्तांतरित |
| ८९० | ९/११/०५ | १५००/- | हस्तांतरित |
| १४५२ | ३१/३/०५ | २६५६/- | हस्तांतरित |
| १४५४ | ३१/३/०५ | ३५४०/- | हस्तांतरित |
| १८६६ | ३१/३/०५ | १४४०/- | हस्तांतरित |

| | | | |
|---|---|---|---|
| ८८४ | ९/११/०५ | ५५५३९/- | हस्तांतरित |
| ८८७ | ९/११/०५ | १६५०/- | हस्तांतरित |
| १८३० ते १८५९ | ३१/३/०५ | २७४१०/- | हस्तांतरित |
| १४५० | ३१/३/०५ | ६७५७०/- | हस्तांतरित |
| १४५३ | ३१/३/०५ | १६५०/- | हस्तांतरित |
| १८६१ | ३१/३/०५ | ३४६५/- | हस्तांतरित |
| १८६७ ते १८०८ | ३१/३/०५ | ३७७८७/- | हस्तांतरित |
| | एकूण | ३,९५,४७४/- | |

तात्पुरते आमन्य रुपये ३,९५,४७४/-

**उपरोक्त प्रकरणी जिल्हा परिषदेने खालील प्रमाणे खुलासा सादर केला :**

वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र वरठी यांनी रेकॉर्ड न दाखविल्याबाबत त्यांचे स्पष्टीकरण मागविण्यात आले होते. त्यांचे स्पष्टीकरण नुसार तेथील लिपिक श्री.एस.के.गायधने हे रजेवर होते ते दिनांक १४/४/०६ ला निलंबित झाले आहे. सद्य:स्थितीत तेथील कामे आरोग्य सहाय्यक पाहत आहेत. लेखा परिक्षणाचे वेळेस आरोग्य सहाय्यक रेकॉर्ड घेवुन उपस्थित झाले होते. परंतु त्यांना लिपिक वर्गीय कामाचा अनुभव नसल्यामुळे रेकॉर्ड व्यवस्थितपणे दाखवू शकले नाही. परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे प्रमाणकाद्वारे झालेला खर्च रुपये ३,९५,४७४- कर्मचाऱ्याच्या वेतन व भत्यावर झालेला आहे. झालेला खर्च नियमित व बांधील स्वरुपाचा आहे.

**ई) श्रीमती गेदाबाई सहसराम धुर्वे रा.हरदोली यांचे विहिर बांधकामाचे मोजमाप पुस्तक उपलब्ध करणेबाबत :- परिच्छेद क्रमांक ३.५८७**

प्रमाणक क्र.५०१ दिनांक २/३/०५ रुपये ८४००

श्रीमती गेदाबाई सहसराम धुर्वे रा.हरदोली यांना २००३-०४ मध्ये विहिर मंजुर करण्यात आली. सदर काम दिनांक ५/२/२००५ ला पुर्ण झाले. एकूण मुल्यांकन रुपये ४४,६७३/- मधून दुसरे चालू बिलाची रक्कम रुपये ३६,२५२/- वजा करुन वरील प्रमाणकावर रुपये ८,४००/- देण्यात आले आहे. मोजमाप एम.बी.नं.२५ चे पान नं.२७ वर असल्याचे नमुद आहे. परंतु सदर एम.बी. व पुर्णत्वाचे प्रमाणपत्र लेखा परिक्षणास उपलब्ध न झाल्याचे

पडताळणी करता आली नाही. तरी संबंधीत मोजमाप पुस्तक व प्रमाणपत्राचे लेखा परिक्षणास उपलब्ध करण्यात यावे.

तात्पुरते आमन्य रुपये ८४००/-

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषदेने खालीलप्रमाणे खुलासा केला :**

श्रीमती गेदाबाई सहसराम धुर्वे रा.हरदोली यांचे विहीर बांधकाम पुर्ण झाले असुन त्याबाबत मोजमाप पुस्तिका क्रमांक २५ चे पान क्र.२१,२३,२७ वर मुल्यांकन करण्यात आले आहे.

तसेच सदर विहीरीचे बांधकाम पुर्ण झल्याबाबत पुर्णत्वाचा दाखला देण्यात आला असुन त्यांची प्रत दप्तरी उपलब्ध आहे.

**१.२ मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-**

पंचायती राज समितीने दिनांक २३/२/२०१२ रोजी जिल्हा परिषद, भंडारा येथे भेट देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सार्वजनिक बांधकाम विभाग, तुमसर या विभागाला अगोदर कळवूनही लेखा परिक्षणाच्या वेळेला कांद्री बेसरा रोड बांधकाम, कांद्री जुना बस स्टॉप शेतापर्यंत जाणारा रस्ता ते कुकडे पांधन रस्ता आणि जांब तांडगांव रस्ता या रस्त्यांच्या कामांचे प्रथम व अंतिम देयकांचे अभिलेखे का दाखविण्यात आली नाहीत असे समितीने विचारणा केली असता अभिलेखे उपलब्ध नसल्यामुळे दाखविण्यात आली नाहीत आता उपलब्ध झालेली आहेत असे कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समितीस सांगितले.

लेखे लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद, भंडारा यांना एकूण तीन अर्धसमास ज्ञापने देण्यात आली तसेच श्री.मेश्राम, प्रभारी कार्यकारी अभियंता यांना प्रत्यक्ष वेळोवेळी भेटून विनंती केली होती. तथापि लेखे उपलब्ध न झाल्यामुळे यास जबाबदार कोण आहे तसेच त्यावेळी कार्यकारी अभियंता कोण होते अशी समितीने विचारणा केली असता यावर दिनांक २५ मार्च, २००८ रोजी पत्राद्वारे कळविले की, लेखे उपलब्ध करुन न देणे हि गंभीर बाब असून आपणांकडून दंड वसुल करण्यात येईल असे सर्व विभागांना पत्राद्वारे कळविले आहे असे कार्यकारी अभियंता यांनी समितीस सांगितले

त्यावर संबंधितांवर दंडात्मक कारवाई करुन याबाबतचा अहवाल १५ दिवसात समितीला सादर करण्यात यावा असे नमूद करुन सदरचे प्रकरण साक्षीसाठी घेण्याचा निर्णय समितीने घेतला.

विहिर बांधकामाचा अभिलेख उपलब्ध करुन देण्यात आला नसल्याने यासंबंधात सदरच्या विहीरीच्या कामाचे एम.बी.रेकॉर्ड का दाखविण्यात आले नाही असे समितीने विचारणा केला असता खैरलांजी येथील विहीरीच्या कामाचे एम.बी.रेकॉर्ड लेखा परिक्षणाच्या वेळी दाखविण्यात आला आहे. तथापि, लंजेरा येथील विहीरीच्या कामाचे एम.बी.रेकॉर्ड दाखविण्यात आले नव्हते तसेच दोन्ही विहीरींचे काम पुर्ण झाले असल्याचे कार्यकारी अभियंता (ल.पा.) यांनी समितीस सांगितले.

ग्रामिण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद, भंडारा अंतर्गत उपविभाग भंडारा येथील सन २००४-२००५ या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षणाच्या वेळी पूर्व सुचना देणे, अर्धसमास पत्र देणे, मौखिकरित्या वारंवार मागणी करुनही लेखा परिक्षणास लेखे उपलब्ध करुन न दिल्याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस असे सांगितले की, सन २००४-०५ या वर्षात लेखा परिक्षणासाठी न दाखविलेले लेखेसंबंधी संपुर्ण दस्तऐवज उपलब्ध ठेवण्यात आले आहे याबाबत बहुतांश अभिलेख उपलब्ध करण्यात आलेला आहे. उर्वरित अभिलेख प्राप्त करण्याची प्रक्रिया सुरु आहे. अभिलेख उपलब्ध करुन देण्यात आले नाही याबाबत संबंधितांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे असे समितीस सांगितले.

प्राथमिक आरोग्य केंद्र, आसगाव, ता.पवनी येथील अधिकाऱ्यांनी लेखा परिक्षणाच्या वेळी अभिलेखे का सादर करण्यात आले नाही अशी समितीने विचारणा केली असता यावर प्राथमिक आरोग्य केंद्राचे कनिष्ठ सहाय्यक हे लेखा परिक्षणाच्या वेळी निलंबित होते त्यामुळे त्यांचा कार्यभार औषध निर्माता यांचेकडे सोपविण्यात आला होता. कनिष्ठ सहाय्यक लेखा परिक्षणाच्या वेळी गैरहजर राहिल्याने त्यांची ४१ दिवस बिनपगाराची रजा करण्यात आलेली आहे तसेच त्यांची एक वेतनवाढ थांबविण्यात आलेली आहे. सध्या कनिष्ठ सहाय्यक प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आस्थापनेवर कार्यरत आहेत. असे जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी सांगितले तर त्यांची एक वेतनवाढ थांबविण्यात आली असुन त्यांना रुपये २५,०००/- इतका दंड करण्यात आलेला आहे असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले.

पंचायत समिती मोहाडी अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, बेटाळा संदर्भात प्राथमिक आरोग्य केंद्रातील कनिष्ठ सहाय्यक यांची बहीण मृत पावली असल्यामुळे ते उपस्थित राहू शकले नाही व ते अभिलेख दाखवू शकले नाही तथापि नंतर संपूर्ण अभिलेखाचे परिक्षण होण्यापूर्वी लेखा परिक्षकांना दाखविण्यात आले असून मान्य करुन घेण्यात आले आहे असे जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी समितीस सांगितले.

प्राथमिक आरोग्य केंद्र, वरठी. ता.मोहाडी यांनीही लेखा परिक्षण संपेपर्यंत अभिलेखे उपलब्ध करुन दिले नाहीत याप्रकरणी तेथील लिपिक यांना निलंबित केले असल्याचे नमूद केले.

श्रीमती गेदाबाई सहसराम धुर्वे, रा.हरदोली यांच्या विहीरीच्या बांधकामाचे मोजमाप पुस्तिका उपलब्ध का करुन देण्यात आली नाही असे समितीने विचारणा केली असता सदरचे अभिलेखे कां दाखविण्यात आले नाही याबाबत मला काही सांगता येणार नाही असे कृषि विकास अधिकारी यांनी समितीस सांगितले.

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात ज्यांनी अभिलेखे सादर करण्यास दिरंगाई केली त्यांचे विरुध्द एक महिन्याच्या आत कारवाई करण्यात यावी या संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल असा समितीने निर्णय घेतला वरील.

**१.३ उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

१. लेखा परिक्षणासाठी विभागने लेखे उपलब्ध करुन देण्याबाबत त्याचप्रमाणे लेखे उपलब्ध करुन न दिल्यास कारवाईबाबतच्या तरतूदी कोणत्या आहेत,

२. सन २००४-०५ या वर्षात लेखा परिक्षणासाठी दिनांक २५/०३/२००९ रोजी सर्व विभागांना पत्रान्वये कळविल्यानंतर कोणकोणत्या विभागाने लेखे उपलब्ध करुन दिले आहेत. नसल्यास त्याची कारणे काय आहेत. तसेच त्या सर्व विभागावर रुपये २५,०००/- एवढ्या रकमेची दंडात्मक कारवाई केली आहे काय, असल्यास केव्हा, याबाबत समितीस खुलासा करण्यात यावा.

३. अहवालातील नमूद अभिलेख परिक्षणासाठी उपलब्ध करुन न देणारे तत्कालीन कार्यकारी अभियंता कोण होते व ते सद्यःस्थितीत नेमके कोठे कार्यरत आहेत याबाबत समितीस खुलासा करण्यात यावा.

**उपरोक्त विषयाप्रकरणी विभागाने खालीलप्रमाणे लेखी माहिती सादर केली.**

१. मुंबई स्थानिक निधी परिक्षा अधिनियम, १९३० मधील कलम ४ नुसार लेखा परिक्षणासाठी आपले लेखे सादर करण्याची स्थानिक प्राधिकरणाची जबाबदारी आहे. कलम ७ नुसार कायदेशिररित्या तिला केलेल्या कोणत्याही आज्ञेचे पालन करण्यात जाणूनबूजून दुर्लक्ष करील किंवा तीचे अनुपालन करण्याचे नाकारील ती दंडाधिकाऱ्यापुढे सिध्दपराध ठरविण्यात आल्यानंतर रु.२५,०००/- असू शकेल इतक्या दंडास पात्र होईल, परंतु या कलमान्वये करावयाची कोणतीही कार्यवाही आयुक्तांच्या लेखी मंजुरीशिवाय दाखल करता कामा नये परंतु आणखी असे की, अशी मंजुरी देण्यापूर्वी आयुक्ताने ज्या व्यक्ती विरुध्द अशी कार्यवाही दाखल करावयाची असेल त्या व्यक्तीस अशी मंजूरी का देण्यात येवू नये याबद्दल कारण दाखविण्यास फर्माविले पाहिजे. पहिल्या वर्गाच्या दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयाहून कमी दर्जाच्या अशा कोणत्याही न्यायालयाने त्या अधिनियमाविरुध्द घडलेल्या कोणत्याही अपराधाची न्याय चौकशी करता कमा नये.

२. ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, भंडारा पत्र क्रमांक ५२८ दि.३/३/२०१२ अन्वये सह संचालक, स्थानिक लेखा निधी यांना लेखे उपलब्ध करुन दिलेल आहेत. त्यानुसार त्यांचे पत्र क्रमांक ७१६/२०१२, दि.१३/७/२०१२ अन्वये उर्वरित लेखे उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. संबंधितास दि.३१/१/२०१२ अन्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेल्या आहेत. त्यावर उपविभागीय अधिकारी यांचा खुलासा प्राप्त आहे व १ शाखा अभियंता यांचा खुलासा प्राप्त असून उर्वरित १ शाखा अभियंता यांचा खुलासा अप्राप्त आहे. याबाबत परत तत्कालीन कार्यकारी अभियंता व उपविभागीय अभियंता यांना कारणे दाखवा नोटीस दि.१८/७/२०१२ ला देण्यात आलेली असून पुढील शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.

३. दि.३/१२/२००५ ते ३१/१०/२००६ या कालावधीत श्री.व्ही.एम.देशमुख, प्रभारी कार्यकारी अभियंता हे कार्यरत होते. सध्या श्री.व्ही.एम.देशमुख ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, पवनी जिल्हा भंडारा येथे कार्यरत आहेत. दि.६/९/२००७ ते ५/११/२००९ या कालावधीत श्री.व्ही.के.टाकळीकर, कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत होते. ते सध्या ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नागपूर येथे कार्यरत आहेत.

**तसेच जिल्हा भेटीच्या वेळी समितीला आश्वासित केल्याप्रमाणे खालील प्रमाणे जिल्हा परिषदेने माहिती सादर केली.**

तीन्ही परिच्छेदाच्या अनुषंगाने लेखा परिक्षणास लेखे सादर करण्यास जाणिवपूर्वक दिरंगाई केलेल्या कर्मचाऱ्यांवर खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

१. प्राथमिक आरोग्य केंद्र आसगांव ता. पवनी- येथील श्री.आर.के. चौधरी तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक (सध्या कार्यरत पंचायत समिती, भंडारा) यांना कार्यालयीन आदेश क्र.भंजिप/आवि/स्था ७/वशि/५६४/१२ दि.११/५/२०१२ अन्वये तात्काळ निलंबीत करण्यात आले असुन विभागीय चौकशी प्रस्तावीत करण्यात आली आहे.
२. प्राथमिक आरोग्य केंद्र बेटाळा पंचायत समिती मोहाडी- येथील श्री.बी.आर.राऊत कनिष्ठ सहाय्यक यांना कार्यालयीन आदेश क्र. क्र.भंजिप/आवि/स्था ७/वशि/५६५/१२ दि.११/५/२०१२ अन्वये तात्काळ निलंबीत करण्यात आले असुन विभागीय चौकशी प्रस्तावीत करण्यात आली आहे.
३. प्राथमिक आरोग्य केंद्र वरठी, ता.मोहाडी- येथील श्री.गायधने, तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक (सध्या कार्यरत पंचायत समिती, लाखांदूर) यांना कार्यालयीन आदेश क्र. क्र.भंजिप/आवि/स्था ७/वशि/५६३/१२ दि.११/५/२०१२ अन्वये निलंबीत करण्यात आलेल असुन त्यांची विभगीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे.

**१.४ विभागीय सचिवांची साक्ष :**

विभागाकडून प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीचे अवलोकन करुन समितीने त्या अनुषंगाने दिनांक ८/८/२०१२ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. लेखा परिक्षणास लेखे सादर न करण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे अशी समितीने विचारणा केली असता यावर सदरचा मुद्दा बांधकाम, पाणी पुरवठा व आरोग्य विभागांसंबंधी उल्लेख आहे. काही विभागांनी

अभिलेखे सादर केले व काही विभागाकडून कोणत्याही प्रकारचे अभिलेख सादर करण्यात आले नाही. २२२ करारनामे सहाय्यक संचालक, स्थानिक लेखा निधी परीक्षा, म.रा.भंडारा यांना लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात आली होती. सदर करारनामे तपासण्यात आले. परंतु उप विभाग येथील ३६ करारनाने मोजमाप पुस्तिका व उपविभाग तुमसर येथील १४ करारनाम्यांचे मोजमाप पुस्तिका उपलब्ध न झाल्यामुळे उपविभाग साकोली व तुमसर येथील १० शाखा अभियंता यांच्यावर लेखा परीक्षणास लेखे उपलब्ध न करुन दिल्याबाबत स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३९ अन्वये २५ हजार दंड वसुलीसाठी व विभागीय चौकशी का करण्यात येऊ नये, अशा प्रकारे संबंधितांना दि.३१/७/२०१२ रोजी कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे, असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगितले तर संबंधितांना कारणे दाखवा नोटीस पाठविण्यासाठी ५ महिन्याचा विलंब का झाला असेही समितीने विचारणा केली असता संबधितांना एकूण तीन वेळा नोटीस पाठविण्यात आल्या आहेत त्यांनी सदरच्या नोटीसेसना उत्तर दिलेले नाही. तथापि, दरम्यानच्या कालावधीत काही प्रमाणात लेखा परिक्षांकडे अभिलेखे सादर करण्यात आलेले आहे असे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगितले. सदरची बाब गंभीर आहे असे नमूद करुन तीन तीन नोटीसेस पाठविण्यात आली तरी संबधितांकडून त्याची कोणतीही दखल घेतली नाही आणि समितीने साक्ष ठेवल्यानंतर अंतिम नोटीस पाठविण्यात आली असे समितीने अभिप्राय व्यक्त केले असता यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, या प्रकरणी दोन प्रकारची कारवाई होऊ शकते. नियम ८ किंवा १० अनुसार निलंबित करणे, विभागीय चौकशी करणे अशा प्रकारे प्रशासकीय कारवाई केली जाते. तसेच गंभीर बाब असल्यास नियम ८ नुसार कारवाई केली जाते. तसेच नियम ७ अनुसार कायदेशीर रित्या दिलेल्या आदेशाचे पालन न करणे, जाणुनबुजून दुर्लक्ष करणे, अशा बाबी दंडाधिकाऱ्यांपुढे सिध्द झाल्यानंतर संबंधित व्यक्ती २५ हजार रुपयांच्या दंडास पात्र होईल. मात्र अशा प्रकारची कारवाई करण्यासाठी आयुक्तांची मंजुरी घेणे आवश्यक असते. तसेच या प्रकरणी लेखा परिक्षण विभागाकडे लेखे सादर न केल्याबाबत लेखा परीक्षकांनी संबधितांविरुध्द आयुक्तांकडे तक्रार करावयाची असते. अशा प्रकरणांमध्ये जेएमएफसी-फस्ट क्लास यांच्याशिवाय कोणीही दखल देऊ शकत नाही. त्यानुसार संबधितांनी लेखा परिक्षण विभागाकडे लेखे सादर न केल्याबाबतची सर्व माहिती आयुक्तांकडे पाठवून

त्यानंतर पुढील कार्यवाही सुरु केली जाईल. या प्रकरणी दिलेल्या कारणे दाखवा नोटीसीमध्ये २५ हजार रुपयांच्या दंडासंबंधी उल्लेख केलेला आहे. शासन स्तरावर अशा प्रकरणांच्या संदर्भात प्रशासकीय कारवाई करुन काही अधिकारी/कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे. २-३ प्रकरणांमध्ये विभागीय चौकशी सुरु केलेल्या आहेत. प्रशासकीय पध्दतीनुसार त्यांना कारणे दाखवा नोटीसेस दिलेल्या आहेत. त्यावर संबंधितांकडून कोणताही लेखी खुलासा प्राप्त न झाल्यामुळे, या प्रकरणी त्यांचे काही म्हणणे नाही असे गृहित धरुन नियमानुसार विभागीय चौकशीची पुढील कारवाई केली जाईल. या प्रकरणी ३ महिन्यात संबंधितांविरुध्द कारवाई करण्यासाठी प्रयत्न केला जाईल असे समितीस सांगितले.

सार्वजनिक बांधकाम विभागा संदर्भात अभिलेखे उपलब्ध करुन न देणारे तत्कालीन अभियंता कोण होते व ते सध्या कोठे कार्यरत आहेत, अशी समितीने विचारणा केली असता यावर तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री.मेश्राम हे जिल्हा ग्रामविकास यंत्रणा येथे कार्यरत होते परंतु त्यांची आता अकोला येथे बदली झाल्यामुळे त्यांना गडचिरोली येथून कार्यमुक्त केलेले आहे. परंतु, ते अद्याप अकोला येथे रुजू झालेले नाहीत. त्यांचा रजेचा अर्ज प्राप्त झालेला नसल्यामुळे त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून आम्ही त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करणार आहोत असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

सार्वजनिक आरोग्य विभागासंदर्भात लेखा परिक्षणास लेखे सादर न करण्याबाबत प्राथमिक आरोग्य केंद्राच्या संदर्भातील लेखे लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात आले नव्हते. त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांना मार्च, २०१२ मध्ये कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. त्यानंतर मे, २०१२ मध्ये त्यांना निलंबित करण्यात आलेले आहे. तिन्ही प्राथमिक आरोग्य केंद्रातील संबंधित कर्मचाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशीचे आदेश देऊन मे महिन्यात त्यांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे. आम्ही विभागीय चौकशी तीन महिन्यात पूर्ण करणार आहोत. ज्यावेळी पथक तपासणीसाठी येते त्यावेळी संबंधित कर्मचाऱ्यांनी लेखे उपलब्ध करुन दिले पाहिजेत. त्यांनी लेखे उपलब्ध करुन न दिल्यास कलम ४ अन्वये संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असे परिपत्रक आम्ही पुढील आठवड्यात काढणार आहोत, असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागासंदर्भात लेखा परिक्षणास लेखे सादर न करण्याबाबत संबंधितांविरुध्द किती दिवसांत कारवाई पूर्ण करण्यात येईल अशी समितीने विचारणा केली असता, यावर संबंधित तीन कर्मचाऱ्यांना दिनांक ३१/१/२०१२ रोजी कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली असून याबाबतची कार्यवाही ३ महिन्यांत पूर्ण करण्यात येईल, त्यापैकी दोन कर्मचाऱ्यांनी कारणे दाखवा नोटिसला उत्तर दिले असून एका कर्मचाऱ्याने उत्तर दिलेले नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

**१.५ अभिप्राय शिफारशी :**

मुंबई स्थानिक निधी परिक्षा अधिनियम, १९३० मधील कलम ४ नुसार लेखा परिक्षणासाठी अभिलेखे सादर करण्याची स्थानिक प्राधिकरणाची जबाबदारी आहे. कलम ७ नुसार कायदेशिररित्या तिला कोणत्याही आज्ञेचे पालन करण्यात जाणून बुजून दुर्लक्ष करील किंवा तीचे अनुपालन करण्यास नाकारील तर रुपये २५०००/- इतक्या दंडास पात्र होईल अशा प्रकारची कायद्यामध्ये तरतुद करण्यात आली आहे. तथापि या तरतुदीनुसार आजपर्यंत कार्यवाही करण्यात आल्याचे दिसुन आले नाही. सार्वजनिक बांधकाम विभाग तुमसर यांनी सदरचे अभिलेख रोहयोचे अनुदान उपलब्ध करण्यासाठी सादर केले होते. दुसऱ्या प्रकरणात कार्यकारी अभियंता मेश्राम यांना अर्धसमासाची तीन ज्ञापने देऊन प्रत्यक्ष भेटून चर्चेद्वारे अभिलेख उपलब्ध करुन देण्यासाठी विनंती करण्यात आली होती. तथापि, याकडे त्यांनी दुर्लक्ष केले व संपुर्ण लेखा परिक्षण होईपर्यंतच्या कालावधीत सादर करण्यात आले नाही. सदरची बाब गंभीर स्वरुपाची असुन श्री.मेश्राम यांचा बेजबाबदारपणा दिसुन येतो. विहीरीच्या कामाचे अभिलेखे आणि ग्रामिण पाणी पुरवठा विभाग यांचे अभिलेख लेखा परिक्षणास उपलब्ध करुन देण्यात येतील असे नमूद केले आहे. म्हणजेच त्यावेळी उपलब्ध करुन दिले नाही त्यामुळे उक्त प्रकरणी संबंधिताचा निष्काळजीपणा असल्याचे दिसून येते. कनिष्ठ सहायक निलंबित झाल्यामुळे त्यांचा पदभार असणारे औषध निर्मात्याला लिपिक पदाचा अनुभव नसल्याने व लिपिक रजेवर गेला असल्याने अभिलेख दाखविण्यात आले नाहीत अशी विविध न पटणारी कारणे सांगितली आहेत. त्यामुळे संबंधित यंत्रणेचा यातून बेजबाबदारपणा दिसून येतो. विभागीय सचिवांची साक्षीत नमूद केल्यानुसार संबंधितांनी कारणे दाखवा नोटीस देण्यात

आल्या आहेत. विभागीय चौकशी करण्यात येत आहे, निलंबित करण्यात आले आहे अशा प्रकारे विविध प्रकारची कारवाई करण्यात येत असल्याचे समितीला सांगितले तथापि, या प्रकारची कारवाई समितीने भेट देऊन एक वर्षाच्या अंतराने साक्ष घेण्यात आली. संबंधितांविरुध्द कारवाई करण्याचे टाळत असल्याचे समितीचे स्पष्ट मत झाले असुन समिती याबाबत नाराजी व्यक्त करीत आहे.

या संदर्भात असेही निदर्शनास आले की, उपरोक्त अधिनियमाच्या तरतूदीनुसार ज्या अधिकाऱ्यांची/कर्मचाऱ्यांनी अभिलेखे लेखा परिक्षणाला सादर केली नाही त्यांच्याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यासाठी संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी सदरचा प्रस्ताव आयुक्तांकडे पाठविणे आवश्यक आहे. तथापि, याबाबतची कार्यवाही स्थानिक निधी लेखा कार्यालयाकडून वेळीच झाल्याची दिसुन येत नाही.

**समिती अशी शिफारस करते की, लेखा परिक्षणास अभिलेख उपलब्ध करुन न देणारे व त्यासाठी विविध कारणे सांगणारे अधिकारी/कर्मचारी यांचेवर मुंबई स्थानिक निधी परिक्षा अधिनियम १९३० अन्वये दंडात्मक तसेच महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ च्या शिस्त व अपिल यामधील नियम ७, ८ व १० अन्वये प्रशासकीय कारवाई करण्यात यावी तसेच स्थानिक निधी लेखा कार्यालयाने दंडात्मक कारवाई करण्यासाठीचा प्रस्ताव संबंधीत संस्थाचे लेखा परिक्षण संपल्यानंतर १ महिन्याचे आत आयुक्तांकडे वेळीच सादर करण्याची काळजी घ्यावी व लेखा परिक्षण विभागाचे जे अधिकारी/कर्मचारी दंडात्मक कारवाईचा प्रस्ताव यापुढे आयुक्तांकडे वेळेवर सादर करणार नाहीत अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी.**

**स्थानिक स्वराज्य संस्थाचे जे अधिकारी/कर्मचारी अभिलेख लेखा परिक्षणासाठी लेखा परिक्षकांडे सादर करणार नाहीत अशा अधिकारी/कर्मचारी यांचेवर दंडात्मक व प्रशासकीय कारवाईस आयुक्तांनी त्यांचेकडे लेखा परिक्षकांकडून दंडात्मक व प्रशासकीय कारवाईचा प्रस्ताव प्राप्त झाले पासुन २ महिन्यांच्या आत कारवाईस मंजूरी देणे बंधनकारक करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात यावा.**

**समितीच्या उपरोक्त शिफारशी बाबत शासनाने केलेली कार्यवाही समितीस २ महिन्यांत सादर करण्यात यावी.**

## प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, अहमदनगर

**२.१ रोजगार हमी योजनेवरील हजेरी सहाय्यकांना सेवेत सामवुन घेताना अनुज्ञेयतेपेक्षा वरिष्ठ वेतनश्रेणी लागु केले बाबत व इतर अनियमितताबाबत (परिच्छेद क्रमांक ३.१०)**

सन २००४-२००५ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील (परिच्छेद क्र.२५)

जिल्हा परिषदेने रोजगार हमी योजनेवरील हजेरी सहाय्यकांना सेवेत सामावुन घेतांना अनुज्ञेयतेपेक्षा वरिष्ठ वेतनश्रेणी लागु केली आहे. याबाबत संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी पुढील अभिप्राय दिले आहेत.

१. जिल्हा परिषदेचे पत्र दि.२४ जून, २००४ नुसार एकुण ७४ हजेरी सहाय्यकांना शासन सेवेत सामावुन घेतले आहे.

२. जिल्हा परिषदेचे पत्र क्र.साप्रवि-१/आस्था/७२८/०४ दि. २१ जुलै, २००४ अन्वये व पत्र क्र. ७२९ दि. २१ जुलै, २००४ अन्वये एकुण ७ हजेरी सहाय्यकांना वरिष्ठ सहाय्यक या पदावर वेतनश्रेणी ४०००-१००-६००० मध्ये जिल्हा परिषद सेवेत सामावुन घेतले आहे.

१) नस्तीचे अवलोकन केले असता अनुसूचित जीती १, विजा अ १, भज क १, भज ड १, इमाव २, खुला प्रवर्ग ३ अशी एकुण ९ प्रवर्गातील पदे

२) रिक्त असतांना खुल्या प्रवर्गातील ७ पदे भरण्यात आली आहेत विभागीय आयुक्त नागपूर, पुणे, कोकण भवन, अमरावती यांनी सदर जेष्ठता सुचीमध्ये मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध नसल्याबाबत कळविले आहे. शासन नियोजन विभाग निर्णय क्र. हकसा/१३९७/प्र. १३६/रोहयो-३ दि. २१ एप्रिल, १९९९ मधील परिच्छेद क्रमांक ७ नुसार हजेरी सहाय्यकातून रिक्त पदे भरताना मागास प्रवर्गातील पदांसाठी विहित टक्केवारी नुसार आलेले आरक्षण तसेच आरक्षणांतर्गत माजी सैनिक/प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त/अपंग महिला इ.करीता असलेले आरक्षण हे देखील विचारात घेणे आवश्यक आहे. परंतु या प्रकरणी आरक्षण व समांतर आरक्षण डावलुन पदे भरण्यात आल्याने शासन निर्णयाचे पालन झाले नाही व सर्व पदे खुल्या प्रवर्गातील भरण्यात आल्याने अनियमितता झाली आहे.

दि.२१ एप्रिल, १९९९ च्या शासन निर्णयानुसार बिंदु नामावली प्रमाणे रिक्त पद अनुसूचीत जातीसाठी राखीव असेल तर ते पद त्या प्रवर्गात हजेरी सहाय्यकाची भरावीत अशी तरतुद आहे. परंतु जिल्हा परिषदेने विभागीय आयुक्तांकडून हजेरी सहाय्यकांच्या जेष्ठता यादीमध्ये अनुसूचीत जाती / जमाती मधील उमेदवार उपलब्ध नसल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतले असतांनाही सदर रिक्त पदे भरण्यासाठी विहित पध्दतीचा अवलंब केला नाही. त्यामुळे अनियमितता झाली असून

३) आरक्षण व समांतर आरक्षणानुसार अनुशेष भरुन काढण्यात आलेला नाही.

शासन नियोजन विभाग निर्णय क्रमांक १३९४/प्र.१८५/रोहयो-३/१, दि.०१ डिसेंबर, १९९५ मधील ३.१ नुसार हजेरी सहाय्यकांना समकक्ष वेतनश्रेणी ७५०-१२-८७० दरो १४-९४० या पदाची आवश्यक असलेली अर्हता असणाऱ्यांना शासकीय किंवा जिल्हा परिषद सेवेत सामावुन घेणे आवश्य होते. वरील शासन निर्णयातील ३.६ नुसार हजेरी सहाय्यकांना देऊ केलेले पद त्यांनी स्विकारणे बंधनकारक आहे. शासन निर्णय क्र.हसका/१३९७/प्र.१३६/रोहयो-३ दि.२१ एप्रिल, १९९९ नुसार गट ड मधील वेतनश्रेणीतील कोणत्याही पदावर व गट क च्या अराजपत्रित पदावर त्यांच्या शैक्षणीक अर्हते प्रमाणे संबंधीत गटातील जी न्युनतम वेतनश्रेणी असेल त्या पदावर संबंधीत हजेरी सहाय्यकांना समावून घ्यावयाचे असतांना ७ हजेरी सहाय्यकांना लिपीक वेतनश्रेणी ३०५०-४५९० या पदावर घेणे आवश्यक असतांना त्यांना वरिष्ठ सहाय्यक वेतनश्रेणी ४०००-१००-६००० या पदावर नियुक्ती दिल्यामुळे झालेली अतिप्रदानाची रक्कम संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करुन वसुल करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त अभिप्रायाबाबत जिल्हा परिषदेने खालील प्रमाणे स्पष्टीकरण केले :-**

१. महाराष्ट्र शासन नियोजन विभागाकडील पत्र क्र. आस्थाप ११०३/प्र.क्र.४५/रोहयो-३ दि. ०७ जुलै, २००३ मध्ये शासनाने मा. विभागीय आयुक्त यांनी हजेरी सहाय्यकांचे शासन/जिल्हा परिषद सेवेत गट क व गट ड च्या रिक्त पदांवर समावेशन करुन घेण्यासाठी शासनाची मान्यता आहे. त्यानुसार हजेरी सहाय्यकांची नियुक्ती विभागीय आयुक्तांनी जेष्ठतेनुसार करावी अशी सुचना सदर पत्रात करण्यात दिलेली आहे. मा. विभागीय आयुक्तांच्या अखत्यारित समावेशनाबाबत जी समिती आहे त्या समितीने हजेरी सहाय्यकांचे समावेशन पुर्ण करावे असेही वरिल पत्रात नमुद आहे. त्यानुसार

मा. विभागीय आयुक्त नाशिक विभाग, नाशिक यांचे कडील पत्र क्र. रोहयो/आर आर-५/५९५/२००४ दि.२२/०६/२००४ च्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे कडील पत्र क्र. रोहयो/कार्या/१८(६)/४०/०४ दि.२४/०६/२००४ नुसार हजेरी सहाय्यकांना जिल्हा परिषद सेवेमध्ये वरिष्ठ सहाय्यक पदावर सामावुन घेणेबाबत सुचना दिलेल्या होत्या. सदरील हजेरी सहाय्यकांची वरिष्ठ सहाय्यक पदावर मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी जिल्हाधिकारी यांना पत्र देऊन आदेश काढणेस सांगितले. त्यानुसार मा. जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या पत्रानुसार नियुक्ती आदेश निर्गत केले आहेत.

२. तसेच सदर हजेरी सहाय्यकांचे समावेशन करणे पूर्वी ४ खुल्या प्रवर्गाच्या जागा वरिष्ठ सहाय्यक या संवर्गामध्ये रिक्त होत्या. सबब मा. जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे पत्रातील ७ हजेरी सहाय्यकांपैकी ४ हजेरी सहाय्यकांना वरिष्ठ सहाय्यक या पदावर सामावुन घेण्यात आलेले आहे व २ हजेरी सहाय्यकांना इतर संवर्गातील रिक्त असणाऱ्या पदावर सामावुन घेण्यात आलेले आहे. सदर हजेरी सहाय्यक हे पदवीधर असल्याने व
मा. विभागीय आयुक्त व मा. जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे निर्णयानुसार त्यांना वरिष्ठ सहाय्यक लिपीक/लेखा पदांवर सामावुन घेण्यात आले आहे व एक हजेरी सहाय्यक हे पदवीधर नसल्याने त्यांना सामावुन घेण्यात आलेले नाही. याबाबतचा अहवाल
मा. जिल्हाधिकारी अहदमनगर यांना सादर करण्यात आलेला आहे.

३. सदर हजेरी सहाय्यकांचे समावेशन करणे पुर्वी या कार्यालयाने मागासवर्गीय आरक्षणाच्या पदावर मागासवर्गीय हजेरी सहाय्यकांच्या नावाची यादी या कार्यालयास पाठविणेबाबत
मा. विभागीय आयुक्त नागपूर, पुणे, नाशिक, कोकण भवन, अमरावती यांच्याकडे मागणी केलेली होती. तथापि मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध नसल्याचे त्यांनी कळविले आहे. त्यानंतरच खुल्या प्रवर्गातील हजेरी सहाय्यकांना सामावुन घेणेत आलेले आहे.

सरळसेवा भरतीने नियुक्ती करतांना जाहिरातीमध्ये एकुण उपलब्ध रिक्त पदांवर समांतर आरक्षण निश्चित करुन पात्र उमेदवारांकडून अर्ज मागवून जिल्हा निवड समितीमार्फत गुणवत्तेनुसार भरती प्रक्रीया करण्यात येते. सबब या प्रकरणात अतिरिक्त झालेले हजेरी सहाय्यक यांचे समावेशन मा. विभागीय आयुक्तांचे पत्राप्रमाणे करण्यात आलेले आहे.

४. मा. विभागीय आयुक्त, नाशिक व मा. जिल्हाधिकारी अहमदनगर यांच्याकडून वरिष्ठ सहाय्यक पदनाम नमुद असलेल्या यादीतील ६ खुल्या प्रवर्गातीलच उमेदवारांना ४ खुल्या प्रवर्गात व दोघांना आरक्षणाच्या (१ उमेदवार इमाव) या पदावर समावेशन करण्यात आले आहे. तसेच या मध्ये एक खुले हजेरी सहाय्यक यांची नियुक्ती बिंदु नामावली मध्ये इमाव या प्रवर्गात दर्शविलेली असले तरी सदर इमाव चे उमेदवार पुढील भरती मध्ये नियुक्त करण्यात आलेले असुन इमाव चे आरक्षण शासन नियमानुसार पुर्ण भरलेले आहे. याबाबत सदरची बिंदु नामावली मा. सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) नाशिक विभाग, नाशिक यांचेकडून दि.०७/११/२००६ रोजी पडताळणी केलेली आहे. अनु.जाती/जमाती मागासवर्गीयांचे उमेदवार उपलब्ध नसल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतलेले आहे.

मा. विभागीय आयुक्त नाशिक यांच्या अखत्यारित असलेल्या समितीने पदनामांसह सुचित केलेनुसार हजेरी सहाय्यकांचे समावेशन त्यांच्या शैक्षणीक अर्हतेनुसार वरिष्ठ सहाय्यक या पदावर रु.४०००-१००-६००० या वेतनश्रेणीत सामावुन घेणेत आलेले आहे. मा. विभागीय आयुक्त, नाशिक व मा. जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी दिलेल्या आदेशानुसार हजेरी सहाय्यकांचे समावेशन वरिष्ठ सहाय्यक या पदावर केलेले आहे. मा. विभागीय आयुक्त यांना नियुक्तीचे प्राधिकार शासनाने दि.०७ जुलै, २००३ च्या पत्रान्वये दिले असल्याने त्यांनी दिलेल्या हजेरी सहाय्यकांची नावे व पदनाम निश्चित केल्याने प्राप्त आदेशानुसार या कार्यालयाने अंमलबजावणी केली आहे. प्रकरणी या कार्यालयामार्फत पत्र क्र.साप्रवि१/आस्था३/१६०/०७, दि.१३/०३/२००७ व आस्था३/२८८/२००९दि.३०/०४/२००९ अन्वये मा.विभागीय आयुक्त, नाशिक व मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे कडेस पत्र सादर करुन लेखा परिच्छेदा कामी

मार्गदर्शन व आदेश प्राप्त करुन घेणे कामी विनंती करण्यात आलेली आहे. प्रकरणी मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचे कडील पत्र क्र.रोहयो/कार्या५/५१०९३/११ दि.०४/११/२०११ अन्वये मार्गदर्शन प्राप्त झालेले असुन जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे कडील प्राप्त यादी दि.०३/०३/२००४ अन्वये प्राप्त प्रस्ताव व त्या सोबत उपलब्ध करुन दिलेल्या प्रपत्र १ व प्रपत्र २ व हजेरी सहाय्यक जेष्ठता यादी विचारात घेऊन त्यास मान्यता दिलेली आहे. जिल्हा परिषदेकडील प्राप्त पत्राच्या अनुषंगाने लेखा परिक्षण अहवालात नमुद केलेल्या हजेरी सहाय्यकांना वरिष्ठ सहाय्यक म्हणुन नियुक्ती देण्यात आलेली आहे. त्या हजेरी सहाय्यकांना कनिष्ठ सहाय्यक संबोधून त्यांना वरिष्ठ वेतन श्रेणीत दिल्याने झालेल्या अतिप्रदानाची रक्कम सुलभ व कालबध्द पध्दतीने संबंधीत वरिष्ठ सहाय्यक यांचेकडून वसुल करावी. तसेच सदर कर्मचाऱ्यांच्या सेवा जेष्ठता कनिष्ठ सहाय्यक या संवर्गात नियमानुसार निश्चित करावी याबाबत आदेश प्राप्त झाले असुन त्यानुसार संबंधीत ६ पैकी ५ वरिष्ठ सहाय्यक यांना कनिष्ठ सहाय्यक पदावर इकडील आदेश क्र.साप्रवि/आस्था३/१५०३ ते १५०७/११ दि.१४/१२/२०११ अन्वये सामावुन घेणेबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. ६ पैकी १ कर्मचारी सेवा निवृत्त असुन त्यांना देखील नियुक्तीच्या दिनांकापासुन कनिष्ठ सहाय्यक संबोधण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. सर्व ६ संबंधित कर्मचारी यांना वरिष्ठ वेतन श्रेणीत दिल्याने झालेल्या अतिप्रदानाची रक्कम वसुलीबाबत संबंधीत कार्यालय प्रमुख यांचेवर जबाबदारी देण्यात आलेली असुन वसुली बाबतचा दरमहाचा अहवाल या कार्यालयास सादर करणे बाबत आदेशीत करण्यात आले आहे. तसेच वसुलीबाबत अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदरचा अहवाल दरमहा सादर करण्याची दक्षता घेण्यात येईल.

## २.२ मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :

अहमदनगर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे अधिक माहित जाणून घेण्यासाठी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, अहमदनगर यांची दिनांक २८ फेब्रुवारी, २०१२ रोजी साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, लेखा परिक्षणात आक्षेप घेतल्यानंतर त्याबाबत विभागीय

आयुक्त/जिल्हाधिकारी यांचेकडे मार्गदर्शन मागविण्यात आले आहे, परंतु सदर उमेदवारांना नियुक्ती देण्यापूर्वी सदर बाब विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी यांचे निदर्शनास का आणण्यात आली नाही, तसेच जादा प्रदानाची रक्कम किती आहे व ती किती टप्प्यात वसुल करण्यात येईल त्यावर यासंदर्भात आयुक्त कार्यालयाकडून मार्गदर्शन घेण्यात आले होते. दिनांक १२ नोव्हेंबर, २०११ पासून सहापैकी पाच वरिष्ठ सहाय्यकांना कनिष्ठ सहाय्यक पदावर समावून घेण्याचे आदेश निर्गमित केलेले आहेत. सहापैकी एक कर्मचारी निवृत्त असुन त्यांना नियुक्तीच्या दिनांकापासून कनिष्ठ सहाय्यक संबोधण्याबाबत निर्देश दिलेले आहेत असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगितले. यासंदर्भात विभागीय आयुक्तांनी जे आदेश पाठविले त्याची जिल्हा परिषदने अंमलबजावणी केली या प्रकरणी विभागीय कार्यालय दोषी आहे. चुक लक्षात आल्यानंतर जिल्हा परिषदेला पत्र पाठवून दुरुस्ती करावी असे आदेश दिले, असे समितीने मत व्यक्त करुन या परिच्छेदाबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात यावी असा समितीने निर्णय घेतला.

**२.३ उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

१. हजेरी सहाय्यकातून रिक्त पदे भरताना सहा वरिष्ठ सहाय्यकांना कनिष्ठ सहाय्यक पदावर घेण्यात आल्याने त्यांना जादाप्रदान करण्यात आलेल्या रक्कमेची वसुली करण्यात आली आहे काय ?

२. सदर प्रकरणी एक कर्मचारी शैक्षणिक दृष्ट्या अपात्र असतानाही त्यास चुकीच्या पध्दतीने नियुक्ती देणाऱ्या विभागीय आयुक्त कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली ?

**समितीच्या उपरोक्त मुद्यांबाबत जिल्हा परिषद विभागाकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

पंरास परिच्छेद ३.१०/३२ रोजगार हमी योजनेवरील एकुण ७ हजेरी सहाय्यकांपैकी ६ हजेरी सहाय्यकांना जिल्हा परिषद सेवेत रिक्त पदी दि.२१/७/२००४ च्या आदेशान्वये सामावून घेणेत आले आहे. एक हजेरी सहाय्यक शैक्षणिकदृष्ट्या अपात्र असलेने त्यांना नियुक्ती देणेत आलेली नाही.

उपरोक्त सहा पैकी एक कर्मचारी जिल्हा परिषद सेवेतुन सेवानिवृत्त झाल्याने त्यांना अतिप्रदान झालेली रक्कम त्यांचे मासिक निवृत्ती वेतनातुन प्रतिमहा रु.२०००/- प्रमाणे अतिप्रदान झालेल्या एकुण रक्कमे पर्यंत वसुली करणेची कार्यवाही माहे फेब्रुवारी, २०१२ पेड इन मार्च, २०१२ चे निवृत्ती वेतन देयका पासुन करणेत येत आहे.

उपरोक्त जिल्हा परिषद येथे नियुक्ती दिलेल्या सहा हजेरी सहाय्यकांपैकी चार हजेरी सहाय्यकांनी मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे रिट पिटीशन दाखल केली असल्याने व मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी सदर कर्मचाऱ्यांच्या वसुलीस स्थगिती दिल्याने उक्त नमुद कर्मचाऱ्यांना अतिप्रदान करणेत आलेली रक्कम वसुल करणेत आलेली नाही.

एक कर्मचारी हे दि.०१/०१/२०१२ पासुन अनधिकृत गैरहजर आहेत. तसेच त्यांना उक्त नमुद दिनांकापासुन वेतन अदा करणेत आलेले नसल्याने त्यांना अतिप्रदान झालेली रक्कम अद्याप वसुल करणेत आलेली नाही.

२. एक हजेरी सहाय्यक शैक्षणिकदृष्ट्या अपात्र असलेने नियुक्ती देणेत आलेली नाही. विषयांकित माहिती मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, कार्यालयाशी संबंधीत असलेने सदर बाबत इकडील पत्र क्र.साप्रवि/आस्था-३/१६५५/१२,दि.२८/०८/२०१२ अन्वये अहवाल मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग यांना सादर करणेत आला आहे.

**२.४ विभागीय सचिवांची साक्ष :-**

अहमदनगर जिल्हा परिषदेच्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक ०६ फेब्रवारी, २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने रोजगार हमी योजनेवरील हजेरी सहाय्यकांना सेवेत सामावून घेताना अनुज्ञेयतेपेक्षा वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करण्यात आलेल्या सहाय्यकांकडून आतपर्यंत किती रक्कम वसुल करण्यात आली आहे व या प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे, अशी विचारणा केली असता रोजगार हमी योजनेवरील जिल्हा परिषदेमध्ये सामावून घेतलेल्या ६ हजेरी सहाय्यकांकडून एकूण रुपये १०,४९,२१३/- एवढी रक्कम वसुल पात्र आहे. त्यापैकी आतापर्यंत रुपये १२,०००/- इतकी रक्कम वसुल करण्यात आलेली आहे. ६ वरिष्ठ सहाय्यकांपैकी ४ सहायकांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद (खंडपिठ) उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असुन

रक्कम वसुल करण्यास न्यायालयाने स्थगिती दिली आहे. या ६ सहाय्यकांना वरिष्ठ सहाय्यक या पदावरुन कनिष्ठ सहाय्यक या पदावर दिनांक १४ डिसेंबर, २०११ रोजी आदेशाने पदावनत करण्यात आलेले आहे. त्यामुळे ४ सहाय्यक न्यायालयात गेले. १ सहाय्यक मनोरुग्ण झाला असुन फरार आहे. तसेच सहावे सहाय्यक सेवानिवृत्त झाले असुन त्यांचेकडून रुपये १२,०००/- इतकी रक्कम वसुल केली असुन अद्याप १०,९३२/- इतकी रक्कम येणे बाकी आहे असे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगितले. यावर समितीने आणखी विचारणा केली की, सुनावणीसाठी तारीख मिळाली का, आजपर्यंत किती सुनावण्या झाल्या आहेत तसेच त्यांची खातेनिहाय चौकशी करण्यात आली आहे काय, हजेरी सहाय्यकांना कनिष्ठ पदावर पदोन्नती न देण्याची कारणे काय आहेत. यावर, न्यायालयाने आतापर्यंत सुनावणीसाठी तारीख दिली नाही तसेच सदरचा विषय खाते निहाय चौकशीचा नाही. सदर हजेरी सहाय्यक पदवीधर आहेत त्यामुळे त्यांना वरिष्ठ सहाय्यक पदावर घेण्याबाबत सुचविले होते असे उपलब्ध कागदपत्रावरुन याबाबतचे आदेश आयुक्तांनी दिल्याचे दिसुन येते असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले. समितीने अशीही विचारणा केली की, ज्या अधिकाऱ्याने चुक केली त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली, चुकीच्या नेमणूकीबद्दल शासनाची भुमिका काय आहे. यावर हजेरी सहाय्यकांना वरिष्ठ सहाय्यक पदवर घेण्यासंबधीचा प्रस्ताव आयुक्त कार्यालयाकडे पाठविण्यात आला होता. त्यानुसार दिनांक २२ जुन, २००४ रोजी मान्यता दिली. हा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडून तयार करण्यात आला होता व त्यास आयुक्त कार्यालयाने मान्यता दिली असे उपायुक्त रोहयो यांनी सांगितले तर आयुक्त पातळीवर वरिष्ठ वेतनश्रेणी देण्यासंबंधीचा प्रस्ताव गेल्यावर त्यावेळी त्याची छाननी होणे आवश्यक होते यात चुक झालेली आहे हे मान्य आहे असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले. तथापि यासंदर्भात दोषी व्यक्तींवर कारवाई करुन त्याबाबतचा अहवाल १५ दिवसांत समितीस सादर करण्यात यावा असे समितीने निदेश दिले. उपरोक्त प्रकरणी अहवाल प्राप्त झाला नसल्याने पुन्हा या कार्यालयाकडून दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३ रोजी पत्र पाठवून याबाबतचा अहवाल १५ दिवसांत पाठविण्यात यावा असे कळविले. त्यानुसार नियोजन विभागाने (रोहयो) असे कळविले की, विभागीय आयुक्त नाशिक विभाग, नाशिक यांनी त्यांच्या दिनांक ११ फेब्रुवारी, २०१३ च्या अ.शा. पत्रान्वये जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना जिल्हा परिषद, अहमदनगर येथे

समावेशनासाठी पाठविलेल्या ६ हजेरी सहाय्यकांना वरिष्ठ पदावर नियुक्ती देण्यास झालेल्या अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या जिल्हाधिकारी कार्यालय, अहदमनगर येथील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कारवाई करण्यास कळविण्यात आले आहे. तसेच विभागीय आयुक्त कार्यालयातील संबंधित अव्वल कारकून यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडून प्राप्त होणाऱ्या अहवालानंतर आणि विभागीय आयुक्त कार्यालयातील कर्मचाऱ्यावर करण्यात आलेल्या कारवाईनंतर एकत्रित अंतिम अहवाल सादर करण्यात येईल असे लेखी पत्रान्वये कळविण्यात आले.

**२.५ अभिप्राय व शिफारशी :-**

महसुल विभागाच्या अखत्यारित असलेल्या व रोजंदारीवर काम करणाऱ्या हजेरी सहाय्यकांना जिल्हा परिषद सेवेत सामावून घेण्याबाबत अवलंबविण्यात आलेली पध्दत पुर्ण चुकीची आहे. कोणत्याही कर्मचाऱ्याला शासकीय/निमशासकीय सेवेत घेताना त्यांना प्रथम ज्या श्रेणीत घ्यावयाचे असेल त्या श्रेणीतील न्युनतम पदावर नियुक्ती करणे आवश्यक आहे. तथापि, सदरचे कर्मचारी पदवीधर असल्याने नियमांचे उल्लंघन करुन वरिष्ठ वेतनश्रेणीत त्यांची नियुक्ती करण्यात आली ही बाब निश्चितच चुकीची व स्वहित लक्षात घेऊन केल्याचे दिसुन येते. लेखा परिक्षण केल्यानंतर सदरची बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर त्याचवेळी योग्य कार्यवाही करणे गरजेचे होते. तथापि, तसे न करता समितीसमोर सदरचा मुद्दा आणल्यानंतर संबंधित सहाय्यकांना कनिष्ठ पदावर पदावनत केले यामध्ये जवळ-जवळ पाच वर्षांचा कालावधी होऊन गेला. त्याचवेळी कार्यवाही केली असती तर आज संबंधितांकडून वसुली करण्याची वेळ शासनावर आली नसती. लेखा परिक्षणात मुद्दा निघाला म्हणून आता कार्यवाही करीत आहे नाहीतर सदरचे प्रकरण नियमबाह्यरित्या अद्याप तसेच राहिले असते. समितीने जिल्हा परिषदेला भेट देऊन एक वर्षाचा कालावधी झाला तथापि याकालावधीत दोषींवर कारवाई करुन त्याचा अहवाल समितीसमोर ठेवणे शक्य झाले असते, परंतु संबंधितांवर कारवाई करण्यास टाळाटाळ करण्यात आली. सदरचे प्रकरण जेंव्हा समितीसमोर आले आणि समितीने विचारणा केल्यानंतर कारवाई करण्यासाठी पाऊले उचलण्यात आली. समितीने साक्षीच्या वेळी निदेश दिल्यानुसार १५ दिवसांत अहवाल सादर करण्यात यावा तथापि उक्त कालावधी होऊनही कारवाई अहवाल प्राप्त न झाल्याने स्मरणपत्र पाठविण्यात आले. त्यास जिल्हाधिकारी

कार्यालयातील व आयुक्त कार्यालयातील संबंधितांवर कारवाई करुन अहवाल मागविण्यात आल्याचे कळविण्यात आहे यावरुन शासन दोषी व्यक्तींना संरक्षण देत असुन कारवाई करण्यास टाळाटाळ करीत असल्याचे समितीचे स्पष्ट मत झाले आहे.

उपरोक्त प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्रस्ताव तयार करुन मान्यतेसाठी आयुक्त कार्यालयाकडे पाठवून त्यास मंजुरी दिली आहे. प्रस्ताव तयार करताना जिल्हाधिकारी कार्यालयाने नियमांचे उल्लंघन केले तसेच आयुक्त कार्यालयास सदरच्या प्रस्तावाची योग्य छाननी होणे आवश्यक असताना आयुक्त कार्यालयाने याकडे पुर्ण दुर्लक्ष करुन नियमबाह्य प्रस्तावास मान्यता दिली याप्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालय जेवढे जबाबदार आहे तेवढेच आयुक्त कार्यालय देखील जबाबदार आहेत असे समितीचे स्पष्ट मत झाले आहे.

**समिती अशी शिफारस करते की, लेखा परिक्षकाने सदरची बाब निदर्शनास आणून देऊनही योग्यवेळी कार्यवाही न करणाऱ्या तसेच सदरच्या सहाय्यकांची नियमबाह्यरित्या वरिष्ठ सहाय्यक पदावर नियुक्ती करण्यास जिल्हाधिकारी व आयुक्त कार्यालयातील जे अधिकारी/कर्मचारी जबाबदार असतील त्यांचेकडून सदरची रक्कम वसुल करण्यात यावी व त्यांनी केलेल्या चुकीबद्दल त्यांचेविरुध्द कठोर कारवाई करुन याबाबतचा अहवाल समितीला दोन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.**

## प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, अहमदनगर

### ३.१ जिल्हा परिषदांनी लेखा परिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणेबाबत

**(परिच्छेद क्रमांक ३.५८७)**

**संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी उपरोक्त प्रकरणी पुढीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत :-**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखापरीक्षणाचे काम सुरु करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरु झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहीत मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुध्दा लेखापरिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत. त्या जिल्हा परिषद/विभाग पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखापरिक्षण पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवुन त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसांच्या आत सादर करणेबाबत सुचित केले जाते तथापि या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमुद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करुन देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करुन देऊनसुध्दा लेखापरिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल जिल्हा परिषदेचे विभाग आणि पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेखांबाबत घेतलेले आक्षेप पुढील प्रमाणे दर्शविण्यात आले आहेत.

| जिल्हा परिषदचे नांव | जिल्हा | लेखापरिक्षण | शासनास परत करावयाची |
|---|---|---|---|

| | परिषदेचा विभाग | अहवालातील परि.क्र. | एकुण रक्कम |
|---|---|---|---|
| अहमदनगर | आरोग्य | ८५ | १६८७६५ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा करण्यात आला.**

प्राथमिक आरोग्य केंद्र आढळगांव ता. श्रीगोंदा यांचे मार्च, २००५ मधील आवश्यक लेख्यांमधील धनादेश नोंदवही लेखा परिक्षणास दर्शविण्यात आलेली असून सदर नोंदवही तपासल्याबाबत लेखा परिक्षण करणाऱ्या संबंधितांची स्वाक्षरी आहे तसेच वेतन वाटप पोहोच ह्या प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर असल्याने पंचायत समिती स्तरावर लेखा परिक्षणास उपलब्ध
झालेली नव्हती ती आता लेखापरिक्षणासाठी शकात नमूद केलेप्रमाणे उपलब्ध करुन ठेवलेली आहेत.

प्राथमिक आरोग्य केंद्राकडील वाहनाचे लॉगबुक व हिस्ट्रीबुक जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे कार्यालयाकडे जमा केलेले असल्याने लेखा परिक्षणास ते उपलब्ध करुन देता आलेले नव्हते ते उपलब्ध करुन घेतले असून लेखापरिक्षणास तयार ठेवले आहे. सर्व प्रमाणके, धनादेश नोंदवही, रोख नोंदवही इत्यादी लेखे प्राथमिक आरोग्य केंद्राकडील वाहन लेखे व खर्चाचे लेखे तसेच वाहन खर्चाची व सादिल देयके लेखा परिक्षणसाठी तयार ठेवलेली आहेत.

श्रीमती एम.डी.पंचमुख यांचे मुळ सेवा पुस्तक त्यांची बदली प्राथमिक आरोग्य केंद्र पिंपळगांव पिसा येथे झाली असल्याने त्यांचे सेवा पुस्तक लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही आता ते उपलब्ध करुन लेखापरिक्षणासाठी तयार ठेवले आहे, असा खुलासा करण्यात आला.

सदरचे लेखापरिक्षण करुन घेण्याकरिता सहाय्यक संचालक स्थानिक निधी लेखा परीक्षा अहमदनगर यांना या कार्यालयाचे पत्र क्र.आरोग्य/लेखा३/३८७/२०११, दि.१९/१२/२०११ व पत्र क्र.आरोग्य/लेखा/५५/२०१२, दि.१०/१/२०१२ अन्वये कळविण्यात आले आहे. उपरोक्त खुलासा मान्य करुन सदरचा परिच्छेद स्विकृत होणेस विनंती.

**३.२ मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :**

अहमदनगर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांची दिनांक २८ फेब्रुवारी, २०१२ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, लेखा परिक्षणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध का करुन देण्यात आले नाही यावर प्राथमिक आरोग्य केंद्राकडील वाहनांचे लॉग बुक व हिस्ट्री बुक जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडे जमा करण्यात आले होते तर श्रीमती एम.डी.पंचमुख यांची बदली झाल्यामुळे मुळ सेवा पुस्तक लेखा परिक्षणास उपलब्ध करुन देता आले नाही असे जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी सांगितले. यासंदर्भात समितीने आणखी विचारणा केली की, लेखा परिक्षणाबाबत जिल्हा परिषदेला कळविण्यात आले होते का, असल्यास किती दिवसांपूर्वी कळविण्यात आले होते असे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस सांगितले. यावर लेखा परिक्षाणासंदर्भात ६ ते ७ महिने अगोदर कळविण्यात आले होते. समितीने अशीही विचारणा केली की, लेखा परिक्षकांनी पूर्व सुचना देऊनही आवश्यक ती कागदपत्रे दाखविली जात नाहीत तर शासनाकडून कोणती कारवाई करण्यात येते. यासंदर्भात आयुक्तांची परवानगी घेऊन संबंधितांविरुध्द गुन्हा दाखल करण्याची तरतूद केली आहे. तसेच जी कोणतीही व्यक्ती कलम-६ पोट कलम-१ खंड अ आणि ब अन्वये कायदेशिररित्या कोणत्याही आज्ञेचे पालन करण्यात जाणूनबुजून दुर्लक्ष करेल किंवा तिचे अनुपालन करण्याचे नाकारेल ती दंडाधिकाऱ्यापुढे सिध्दपराध ठरविल्यानंतर रुपये २५,०००/- असु शकेल इतक्या दंडास पात्र होते परंतु या कलमान्वये करण्याची कोणतीही कार्यवाही आयुक्तांच्या लेखी मंजुरी शिवाय दाखल करता येत नाही असे मुख्य लेखा परिक्षक यांनी समितीस सांगितले. तसेच यासंदर्भातील मुख्य आरोग्य अधिकारी यांची प्रकृती बिघडल्यामुळे अनुपस्थित राहण्याची लेखी पत्रान्वये विनंती केली असुन सोबत डॉक्टारांचे प्रमाणपत्र जोडण्यात आले आहे. याबाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कोणती कारवाई केली अशी समितीने विचारणा केली असता यावर रुपये २५,०००/- इतका दंड आकारण्याबाबत परिपत्रक जारी केले आहे असे समितीस त्यांनी सांगितले यावर २५,०००/- दंड वसुल करुन समितीला कळविण्यात यावे असे समितीने निदेश दिले असता अद्याप कळविण्यात आले नाही. तथापि यासंदर्भात समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेण्याचा निर्णय घेतला.

**३.३ समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या घेतलेल्या साक्षीतून समितीने खालील मुद्यासंदर्भात विभागाकडून अधिक माहिती मागविली.**

१. लेखा परिक्षण विभागाने पूर्व सुचना देवूनही लेखा परिक्षणाच्या वेळी कागदपत्रे सादर न केलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर आयुक्तांची परवानगी घेवून संबंधितांवर गुन्हा दाखल केला आहे काय, असल्यास केव्हा, या बाबतस्पष्टीकरण देण्यात यावे.

२. लेखा परिक्षणाच्यावेळी अभिलेख सादर न करणाऱ्या जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून २५,००० रुपये वसुल करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

३. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अहमदनगर जिल्हा परिषदेमध्ये बैठकीस अनुपस्थित रहाणाऱ्या तत्कालीन २० अधिकाऱ्यांकडून खुलासा मागविण्यात आला आहे काय ? असल्यास केव्हा, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्यासंदर्भात विभागाकडून तसेच अहमदनगर जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

१. प्राथमिक आरोग्य केंद्र आढळगांव, ता.श्रीगोंदा यांनी त्यांचेकडील अभिलेख्यापैकी रोखवही, धनादेश नोंदवही इत्यादी लेखा परिक्षणाच्या वेळीच दर्शविण्यात आलेली असल्याने सदर अधिकारी/कर्मचारी यांच्यावर गुन्हा दाखल केला नाही.

   लेखा परिक्षणास न दर्शविण्यात आलेली कागदपत्रे वेतन वाटप पोहोच इत्यादी सन २०१०-११ चे लेखा परिक्षणाचे वेळी उपलब्ध करुन दिले असुन सदरचे लेखा परिक्षण केले बाबतचे स्थानिक निधी लेखा अहमदनगर यांचे प्रमाणपत्र सोबत सादर केले आहे.

२. अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आले असुन लेखा परिक्षण केलेबाबत प्रमाणपत्र सादर केले आहे. यापुढे अशी अनियमितता होणार नाही याची खबरदारी घेण्यात येत आहे.

   मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० चे कलम ६ अन्वये दस्तऐवज सादर करण्यास व संबंधित व्यक्तींना हजर रहाण्यास इत्यादी फर्मावण्याचा लेखा परिक्षणास अधिकार आहे. कलम ६ प्रमाणे कार्यवाही न झाल्यास संबंधित कर्मचाऱ्याविरुध्द मा. विभागीय आयुक्तांच्या पुर्व मंजुरीने दंडात्मक कार्यवाहीसाठी प्रस्ताव सादर

करण्याची कार्यवाही स्थानिक निधी लेखा विभागाने उक्त अधिनियमाच्या कलम ७ अन्वये करणे आवश्यक आहे.

दंडाधिकाऱ्यांकडून दंड वसुल करणेबाबत कोणतेही आदेश जिल्हा परिषदेस प्राप्त नसल्याने दंड वसुलीची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

३. जिल्हा परिषदेमध्ये अनुपस्थित रहाणाऱ्या तत्कालीन २० अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस क्रमांक/साप्रवि-१/आस्था-१/२३८/२०१२ दिनांक २८/२/२०१२ देण्यात आलेली आहे.

संबंधित अधिकाऱ्यांकडून खुलाशे प्राप्त झालेले असून खुलाशाचे अवलोकन केले असता कोणतेही अधिकारी बैठकीस जाणीव पूर्वक गैरहजर राहिलेले नाहीत.

**३.४ विभागीय सचिवांची साक्ष :-**

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ६ फेब्रुवारी, २०१३ रोजी संबंधित विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या दरम्यान समितीने अशी विचारण केली की, लेखा परिक्षण विभागाने पुर्व सुचना देऊनही लेखा परिक्षणाच्या वेळी कागदपत्र सादर न केलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचेवर आयुक्तांची परवानगी घेऊन गुन्हा दाखल केला आहे काय, यावर लेखा परिक्षणाच्या वेळी काही अभिलेख दाखविण्यात आले होते तर काही अभिलेख दाखविण्याचे राहिले होते. लेखा परिक्षकांनी २२ मार्च, २०१२ रोजी दिलेल्या प्रमाणपत्रात असे म्हटले आहे की, प्राथमिक आरोग्य केंद्र आढळगाव, ता. श्रीगोंदा येथील सन २००४-०५ या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्र. ८५ प्राथमिक आरोग्य केंद्र, आढळगाव येथील धनादेश नोंदवही व वेतन वाटपाची पोहोच इत्यादी अभिलेख लेखा परिक्षणाच्या वेळी उपलब्ध झालेली नाहीत सदरचा परिच्छेद पंचायती राज समितीमध्ये सामाविष्ट झालेला आहे. तरी आता सदरच्या अभिलेख्याचे लेखा परिक्षण हाती घेण्यात आलेले असुन ते पुर्ण करण्यात आलेले आहे. सदरच्या परिच्छेदामध्ये तपासणीअंती परिच्छेद निरंक आहे. सहाय्यक लेखा परिक्षा अधिकारी स्थानिक निधी लेखा, अहमदनगर यांनी तसे प्रमाणपत्र दिले आहे असे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगितले तर गुन्हा दाखल करण्यासंबंधात स्थानिक निधी लेखा विभागाने संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर गुन्हा दाखल करण्यास परवानगी

द्यावी असे कळविले पाहिजे असे नमूद करुन संबंधितांकडून रुपये २५,०००/- इतका दंड वसुल करण्यात आला आहे असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

**३.५ अभिप्राय व शिफारशी :-**

जिल्हा परिषदेचे लेखा परिक्षण करणेसंदर्भात सर्वसाधारणपणे ६ ते ७ महिने अगोदर संचालक, स्थानिक निधी लेखा यांचेकडून कळविले जाते की ज्यामुळे जिल्हा परिषदेचे सर्व अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध होतील. तथापि, प्रत्यक्ष लेखा परिक्षणाच्या वेळी अभिलेखे तयार नाहीत, उपलब्ध नाहीत, मुख्य कार्यालयाकडे पाठविण्यात आले आहेत, संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची बदली झालेली आहे अशी विविध कारणे सांगितली जातात आणि साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली असता सदरचे लेखे लेखापरिक्षणास उपलब्ध आहेत असे सांगितले जाते. लेखा परिक्षण चालू असताना लेखा परिक्षण साधारणत: संबंधित अधिकरी एक आठवडा इतक्या कालाधीकरिता उपस्थित असतात एवढ्या कालावधीत लेखे उपलब्ध करुन देणे सहज शक्य आहे. तथापि संबंधित अधिकाऱ्यांनी लेखे अपुर्ण असल्याने आणि लेख्यांवर खाडाखोड केलेली असल्याने लेखे उपलब्ध करुन दिले जात नाही असे समितीचे स्पष्ट मत झाले आहे. हि बाब गंभीर असुन याबाबतीत संबंधितांवर योग्य ती कारवाई होणे आवश्यक आहे. तसेच संचालक, स्थानिक निधी लेखा यांना लेखे उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी नियमानुसार संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करण्यासाठी आयुक्तांकडे प्रस्ताव पाठविणे आवश्यक असल्याने त्यांचेकडून तशी कार्यवाही केली जात नाही. स्थानिक निधी लेखा यांचेकडून लेखा परिक्षणात मुद्दा घेतला जातो परंतु त्रुटीबद्दल कार्यवाही करणे आवश्यक असताना तसे केले जात नाही यासंदर्भात ते टाळाटाळ करीत असल्याचे समितीचे मत झाले आहे.

**समिती अशी शिफारस करते की, लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध करुन न देणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम १९३० चा सुधारित अधिनियम सन २०११ चा कलम ८ नुसार कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावा.**

# परिशिष्ट
# समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त

**मंगळवार, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१२**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, भंडारा**

**उपस्थिती :**

१. श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री.हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, वि.स.स.

३. श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

४. श्री.बापूसाहेब पठारे, वि.स.स.

५. डॉ.खुशाल बोपचे, वि.स.स.

६. श्री.सुरेश खाडे, वि.स.स.

७. श्री.विष्णु सावरा, वि.स.स.

८. श्री.अनिल राठोड, वि.स.स.

९. श्री.विजयराव औटी, वि.स.स.

१०. श्री.दादाजी भुसे, वि.स.स.

११. प्रा.सुरेश नवले, वि.स.स.

१२. श्री.विक्रम काळे, वि.प.स.

१३. ॲड. उषा दराडे, वि.प.स.

१४. श्री.सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव

**ग्रामविकास विभाग**

श्री.प्रियदर्शन कांबळे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरिक्षा कार्यालय**

श्री.र.भा.भागवत, संचालक

**जिल्हा परिषद, भंडारा**

श्री.अरुण डुबे, मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री.डी.एस.पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री.पंकज गिरी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

श्री.एन.बी.यादव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य)

श्री.राजेश कुलकर्णी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

कु.प्रमिला प्रा.जाखलेकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (म.बा.क.)

श्री.एस.के.सांगोळे, प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं.

डॉ.एम.बी.गणवीर, जिल्हा आरोग्य अधिकारी

श्री.आर.आर.चोपडे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

श्री.पी.एल.खंडाते, कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु)

डॉ.एस.जी.चव्हाण, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

श्री.व्ही.टी.गऱ्हाटे, शिक्षाणाधिकारी (प्राथमिक)

श्री.नारायण जोशी, शिक्षणाधिकारी (माध्य) तथा प्रभारी शि.अ.(निरंतर शिक्षण)

श्री.एम.बी.शेंडे, कृषी विकास अधिकारी

श्री.राजेश पांडे, समाजकल्याण अधिकारी

श्री.पी.एन.मंगरुळकर, उप अभियंता, भु.स.वि.यं.

श्री.आर.एस.दडमल, गट विकास अधिकारी, पं.स. भंडारा

सौ.मंजुषा ठवकर, गट विकास अधिकारी, पं.स. तुमसर

श्री.आर.व्ही.राठोड, गट विकास अधिकारी, पं.स. लाखांदूर

श्री.राजेश बागडे, गट विकास अधिकारी, पं.स. लाखनी

श्री.लिल्हारे, गट विकास अधिकारी, पं.स. साकोली

श्री.आर.एम.टेटे, गट विकास अधिकारी, पं.स.पवनी

श्री.सी.जी.चव्हाण, गट विकास अधिकारी, पं.स.मोहाडी

सौ.पी.यु.वानखेडे, उप अभियंता, बांधकाम उपविभाग क्र.१

व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने भंडारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००४-२००५ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील भंडारा जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

## मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०१२

## स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, अहमदनगर

### उपस्थिती

१. श्री.बबनराव शिंदे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

३. श्री.बापुसाहेब पठारे, वि.स.स.

४. डॉ.खुशाल बोपचे, वि.स.स.

५. श्री.सुरेश खाडे, वि.स.स.

६. श्री.विष्णु सावरा, वि.स.स.

७. श्री.अनिल भैय्या राठोड, वि.स.स.

८. श्री.विजयराव औटी, वि.स.स.

९. श्री.दादाजी भुसे, वि.स.स.

१०. श्री.नितीन भोसले, वि.स.स.

११. प्रा.सुरेश नवले, वि.प.स.

१२. श्री.विक्रम काळे, वि.प.स.

१३. ॲड.उषा दराडे, वि.प.स.

१४. श्री.सय्यद पाशा पटेल, वि.प.स.

१५. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

### महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव

श्री.प्रदीप मयेकर, कक्ष अधिकारी

### ग्रामविकास विभाग, मंत्रालय

श्री.विजय भोसले, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखा संचालनाय, मुंबई**

श्री.र.ना.भागवत, संचालक

श्री.व्ही.पी.सोनावणे, सहाय्यक संचालक, पंरास,

स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय, मुंबई

श्री.मा.श.नागरगोजे, सहसंचालक,

स्थानिक निधी लेखा, नाशिक विभाग.

**अहमदनगर जिल्हा परिषद अधिकारी**

श्रीमती रुबल अग्रवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री.रवींद्र पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री.विवेक गुजर, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा

श्री.कृष्णराव साळुंखे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

श्री.अशोक पावडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र)व (बाल कल्याण)

श्री.जगन्नाथ भोर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.)

डॉ.कारभारी खरात, जिल्हा आरोग्य अधिकारी

श्री.दिनकर टेमकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

श्री.नवनाथ औताडे, शिक्षणाधिकारी (मा.) (प्र.)

श्री.संभाजी गायकवाड, कृषी विकास अधिकारी

डॉ.सुनील तुंबारे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी व समाज कल्याण अधिकारी (प्र.)

श्री.दिलीप पालवे, कार्यकारी अभियंता, सा.बा. (उत्तर)

श्री.पोपट खंडागळे, कार्यकारी अभियंता, सा.बा. (दक्षिण)

श्री.शिवशंकर निकम, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा

श्री.प्राणसिंह बिसेन, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे

श्री.नवनाथ औताडे, उप शिक्षणाधिकारी (मा)

श्रीमती माया शिर्के, वरिष्ठ लेखाधिकारी

श्री.पोपट काळे, उप शिक्षणाधिकारी (सर्व शिक्षा अभियान)

सर्व गट विकास अधिकारी व इतर संबंधित अधिकारी

श्री.पी.एम.राऊत, माजी गट विकास अधिकारी, राहुरी

श्री.मुरलीधर वाघ, माजी गट विकास अधिकारी, कोपरगाव

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने अहमदनगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००४-२००५ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील अहमदनगर जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक ८ ऑगस्ट, २०१२**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

१. श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री.काशिराम पावरा, वि.स.स.

३. श्री.वैजनाथ शिंदे, वि.स.स.

४. श्री.विजय खडसे, वि.स.स.

५. श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

६. श्री.दिलीप माने, वि.स.स.

७. श्री.भारत भालके, वि.स.स.

८. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

९. श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.

१०. श्री.संजय राठोड, वि.स.स.

११. श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.

१२. श्री.प्रकाश भोईर, वि.स.स.

१३. श्री.विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित**

१४. श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव

श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी

श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव

**स्थानिक निधी लेखा परिक्षा, नवी मुंबई**

श्री.के.एम.विधाते, संचालक

**विभागीय प्रतिनिधी**

श्री.सहारिया, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग

श्री.गिरीराज, प्रधान सचिव, जलसंधारण विभाग

श्री.संधू, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव, पाणी पुरवठा विभाग

श्री.टी.एस.बेंजामिन, अपर मुख्य सचिव, आरोग्य विभाग

श्रीमती सीमा उकार्डे, सह सचिव

श्री.ना.रा.रौराहे, सह सचिव

डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी, उप सचिव, ग्रामविकास विभाग

श्री.सुनिल चव्हाण, उप सचिव, लसंधारण विभाग

श्री.एकनाथ मोरे, उप सचिव, ग्रामविकास विभाग

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००४-२००५ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात भंडारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, जलसंधारण विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, पाणी पुरवठा विभाग, अपर मुख्य सचिव, आरोग्य विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, जलसंधारण विभाग, यांची साक्ष घेतली.

## बुधवार, दिनांक ६ फेब्रुवारी, २०१३

## स्थळ : विधान भवन, मुंबई

**उपस्थिती :**

१. श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री.वैजनाथ शिंदे, वि.स.स.

३. श्री.विजय खडसे, वि.स.स.

४. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

५. श्री.संजय जाधव, वि.स.स.

६. श्री.विक्रम काळे, वि.प.स.

७. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी

श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव

**स्थानिक निधी लेखा परिक्षा कार्यालय**

श्री.के.एम विधाते, संचालक

**विभागीय प्रतिनिधी**

श्री.व्ही.गिरीराज, प्रधान सचिव, रोहयो विभाग

श्री.एस.एस.संधू, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

श्री.मुखर्जी, सचिव (बांधकाम), सार्वजनिक बांधकाम विभाग

श्री.दि.ग.मोरे, सह सचिव, ग्रामविकास विभाग

श्री.कांतीलाल उमाप, उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

श्री.एम.पी.तुम्मोड, उप आयुक्त (रोहयो) नाशिक

श्री.जी.के.नाईक, सह संचालक, आरोग्य सेवा

श्री.पी.यू.बिसेन, कार्यकारी अभियंता, ल.पा.वि.जि.प.अहमदनगर

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००४-२००५ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन/सन २००५-२००६ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात अहमदनगर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेलया माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, रोहयो विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव (बांधकाम), सार्वजनिक बांधकाम विभाग, सह सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, उप आयुक्त (रोहयो) नाशिक, सह संचालक, कार्यकारी अभियंता, ल.पा.वि.जि.प.अहमदनगर यांची साक्ष घेतली.

## दिनांक - ०९ एप्रिल, २०१३
## स्थळ : विधान भवन, मुंबई
## उपस्थिती

**समिती प्रमुख**

१. श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री.काशिराम पावरा, वि.स.स.

३. श्री.वैजनाथ शिंदे, वि.स.स.

४. श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.

५. श्री.विजय खडसे, वि.स.स.

६. श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

७. श्री.दिलीप माने, वि.स.स.

८. श्री.भारत भालके, वि.स.स.

९. श्री.उदय सामंत, वि.स.स.

१०. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

११. श्री.बापूसाहेब पठारे, वि.स.स.

१२. श्री.आण्णा बनसोडे, वि.स.स.

१३. श्री.दादाराव केचे, वि.स.स.

१४. श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.

**१५. *श्री.जयकुमार रावल, वि.स.स.**

१६. श्री.विष्णू सावरा, वि.स.स.

१७. श्री.संजय (बंडू) जाधव, वि.स.स.

१८. श्री.संजय राठोड, वि.स.स.

१९. श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.

२०. श्री.प्रकाश भोईर, वि.स.स.

२१. श्री.एम.एम.शेख, वि.प.स.

२२. डॉ.सुधीर तांबे, वि.प.स.

२३. श्री.दिपक साळुंखे, वि.प.स.

२४. श्री.विक्रम काळे, वि.प.स.

२५. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

**निमंत्रीत**

२६. श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री.भाऊसाहेब कांबळे, अतिरिक्त सचिव
श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव
श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव
श्री.रंगनाथ खैरे, कक्ष अधिकारी

**संक्षिप्त कार्यवृत्त**

समितीने बैठकीत तेराव्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन ते किरकोळ सुधारणासह संमत केले.